




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १५४ * नांदेड * बुधवार, दि. १० जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# मान्सून मुंबईत दाखल; राज्यातील २५ जिल्ह्यांना अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)–** मान्सून मुंबईत दाखल झाला आहे. यामुळे राज्यातील विविध भागांत वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळत आहेत. बुधवारी कोकण ते विदर्भ २५ जिल्ह्यांना वादळी पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

मराठवाड्यात उष्ण आणि दमट हवामान असून छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि परभणी जिल्ह्यांमध्ये आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस पडू शकतो. वाऱ्याचा वेग ३० ते ४० किमी प्रतितास राहण्याचा अंदाज आहे.

कोकण विभागातील काही जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे.

मध्य महाराष्ट्रात सक्रिय हवामान प्रणालीमुळे उष्ण आणि दमट वातावरणासह मेघगर्जना, वादळी वारे आणि पावसाची शक्यता कायम आहे. मान्सून सोलापूरपर्यंत पोहोचला असून येत्या आठवड्यात काही भागांत वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच पुण्यासह सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांना देखील येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

उत्तर महाराष्ट्रातील काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असली तरी अनेक भागांत कोरडे हवामान कायम राहण्याचा अंदाज आहे. तर नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

यासह विदर्भात अद्याप उष्ण आणि दमट हवामानाचा प्रभाव कायम असून तापमान ४० ते ४३ अंश सेल्सिअस दरम्यान नोंदवले जात आहे. काही ठिकाणी मेघगर्जनेसह हलक्या पावसाचा अंदाज असून ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

## दहशतवाद्यांचे मदतनीस शोधण्यासाठी एनआयएचे १८ ठिकाणी छापे

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** दहशतवाद्यांचे मदतनीस शोधण्यासाठी एनआयएने पंजाब आणि हरियाणात एकूण अठरा ठिकाणी छापे टाकले.




पाकिस्तानी दहशतवादी शहजाद भट्टीशी लागेबांधे असलेल्यांना शोधण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. डिजिटल उपकरणांच्या सहकार्याने एकमेकांच्या संपर्कात राहणे, संशयास्पद आर्थिक व्यवहार आणि संवेदनशील माहितीची देवाणघेवाण या प्रकरणी एनआयएने ही कारवाई केली. छापे टाकून एनआयएने अनेक डिजिटल उपकरणे तसेच कागदपत्रे जप्त केली. या जप्तीमधून भारतविरोधी षडयंत्राचा सुगावा लागल्याचे समजते. या प्रकरणात पुढील चौकशीसाठी काही जणांना एनआयए कार्यालयात हजर होण्यासाठी नोटीस बजावण्यात आली आहे. लवकरच या प्रकरणात धरपकड होण्याची शक्यता आहे.

एनआयएच्या आतापर्यंतच्या तपासात, पंजाबच्या जालंधर येथील सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर रॉजर संधूच्या निवासस्थानावर मार्च २०२५ मध्ये झालेल्या ग्रेनेड हल्ल्यामागे शहजाद भट्टीचा हात असल्याचे निष्पन्न झाले आहे. या वर्षी एप्रिलमध्ये, एनआयएने भट्टी आणि या प्रकरणातील आणखी एका आरोपीविरुद्ध फरार म्हणून आरोपपत्र दाखल केले होते. सिरसा प्रकरणात, एनआयएने मे २०२६ मध्ये भट्टी आणि पाकिस्तानस्थित दुसरा हँडलर, सोहेल अहमद उर्फ सोहेल बलोच याच्यासह नऊ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते.

## २१ जूनच्या 'नीट' पुनर्परीक्षेसाठी सुरक्षा यंत्रणा सज्ज

### थेट हवाई दलाच्या हेलिकॉप्टर्सने १८ केंद्रांवर पोहोचणार प्रश्नपत्रिका!

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी देशभरात घेण्यात येणाऱ्या 'नीट' परीक्षेच्या मागील पर्वात उडालेल्या पेपरफुटीच्या गोंधळामुळे प्रशासनावर मोठी नामुष्की ओढवली होती. या पार्श्वभूमीवर, येत्या २१ जून रोजी होणाऱ्या पुनर्परीक्षेसाठी 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'ने आतापर्यंतची सर्वाधिक कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे. विशेष लक्षवेधी बाब म्हणजे, देशातील अतिसंवेदनशील आणि प्रमुख १८ केंद्रांवर प्रश्नपत्रिका सुरक्षित पोहोचवण्यासाठी थेट भारतीय हवाई दलाच्या 'एमआय-१७' हेलिकॉप्टर्सचा वापर केला जाणार आहे.

यापूर्वी रस्तेमार्गे प्रश्नपत्रिकांची वाहतूक करताना अनेक सुरक्षेचे प्रश्न निर्माण झाले होते. या संभाव्य धोक्यांना पूर्णपणे फाटा देण्यासाठी आता हवाई दलाने कमान हाती घेतली आहे. देशातील १८ मुख्य ठिकाणांवरून सीलबंद प्रश्नपत्रिकांचे बॉक्स अत्यंत वेगाने आणि सुरक्षितपणे संबंधित वितरण व परीक्षा केंद्रांपर्यंत पोहोचवण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी हवाई दलाकडे सोपवण्यात आली आहे. रस्ते वाहतुकीत होणारा विलंब आणि मध्येच पेपर फोडला जाण्याची शक्यता या निर्णयामुळे जवळपास संपुष्टात आली आहे.

फक्त हेलिकॉप्टर्सच नव्हे, तर गरजेनुसार लष्कराची इतर मालवाहू विमानेही या मोहिमेत सहभागी होऊ शकतील. प्रश्नपत्रिका लवकरात लवकर आणि कोणत्याही मानवी हस्तक्षेपाविना केंद्रांवर पोहोचाव्यात, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय, कोणत्याही अनपेक्षित किंवा आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी लष्कर आणि विशेष सुरक्षा दलाच्या तुकड्यांना 'स्टँडबाय' मोडवर ठेवण्यात आले आहे, जेणेकरून वेळ पडल्यास त्वरित कारवाई करता येईल.

परीक्षेची विश्वासार्हता पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी ने अत्यंत टोकाचे पाऊल उचलले आहे. ज्या वरिष्ठ शिक्षणतज्ज्ञांवर प्रश्नपत्रिका तयार करण्याची जबाबदारी आहे, त्यांना एका अज्ञात आणि अतिसुरक्षित स्थळी 'लॉकडाऊन' म्हणजे नजरकैदेत ठेवण्यात आले आहे. या तज्ज्ञांना त्यांचे मोबाईल फोन, स्मार्टवॉचेस, लॅपटॉप्स आणि इंटरनेटशी जोडलेली कोणतीही उपकरणे सोबत बाळगण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. या गुप्त ठिकाणच्या प्रवेशावरही अत्यंत कडक निर्बंध लादण्यात आले असून, परिपूर्ण गुप्तता पाळली जात आहे.

गेल्या वेळेस झालेल्या त्रुटींतून धडा घेत, एनटीएने संपूर्ण प्रक्रियेचे विकेंद्रीकरण केले आहे. प्रश्नपत्रिकांची निर्मिती, त्यातील दुरुस्त्या, विविध प्रादेशिक भाषांमधील भाषांतर, प्रत्यक्ष छपाई, बॉक्सचे पॅकेजिंग, साठवणूक आणि अंतिम टप्प्यातील वितरण यासाठी पूर्णपणे वेगवेगळ्या टीम्स बनवण्यात आल्या आहेत.

## राज्यातील चार आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य शासनाने राज्यातील ४ वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. यामध्ये नागपूर, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यामध्ये नागपूर विभागाच्या अतिरिक्त विभागीय आयुक्त डॉ. माधवी खोडे चवरे यांची बदली मुंबईमध्ये करण्यात आली आहे.

राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत मंगळवारी हा अधिकृत बदली आदेश जारी करण्यात आला आहे. यामध्ये

डॉ. माधवी खोडे-चवरे यांची सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे बदली झाली. यासह सुनील महिंद्रकर यांची अतिरिक्त मुद्रांक नियंत्रक, मुंबई येथे बदली झाली आहे. अनिता मेश्राम यांची आयुक्त, मनरेगा नागपूर येथे बदली झाली आहे. तर आदित्य जिवणे महानगरपालिका आयुक्त, जळगाव महानगरपालिका, जळगाव येथे बदली झाली आहे.

## पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये हिंसा; आंदोलक-सुरक्षा दल संघर्षात ३0 ठार, २00 हून अधिक जखमी

**रावलकोट (वृत्तसंस्था)–** पाकव्याप्त काश्मीरमध्ये सरकारविरोधी आंदोलनाला हिंसक वळण लागल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली आहे. आंदोलनकर्ते आणि पाकिस्तानी सुरक्षा दल यांच्यात झालेल्या संघर्षात ३० जणांचा मृत्यू झाला असून २०० हून अधिक नागरिक जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.




महागाई, वाढती बेरोजगारी, वीजदरवाढ आणि राजकीय हक्कांच्या प्रश्नांवरून नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. स्थानिक प्रशासनाने जॉइंट आवामी ॲक्शन कमिटी यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेला मोर्चा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचे सांगत बेकायदेशीर घोषित केला आणि त्यावर बंदी घातली. यानंतर आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये संघर्ष उफाळून आला.

गेल्या आठवड्यात रावळकोट येथे एका व्यापाऱ्याची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या हत्येमागे प्रशासनाचा हात असल्याचा आरोप करण्यात आल्यानंतर संतप्त नागरिक रस्त्यावर उतरले. रविवारी रात्री आंदोलकांनी रुग्णालय आणि शवगृहाबाहेर मोठ्या प्रमाणात गर्दी केली. या पार्श्वभूमीवर परिस्थिती अधिकच चिघळली. पूँछ विभागाचे पोलिस अधीक्षक सरदार वाहिद खान यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांच्या गोळीबारात किमान सहा आंदोलकांचा मृत्यू झाला. मात्र त्यानंतर संघर्ष अधिक तीव्र झाला आणि विविध भागांत हिंसाचाराच्या घटना घडल्या.

## मध्य प्रदेशात काँग्रेसच्या उमेदवाराचा अर्जच बाद

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पार्टीने आक्षेप घेतल्यानंतर काँग्रेसच्या राज्यसभा उमेदवार मीनाक्षी नटराजन यांचा उमेदवारी अर्ज फेटाळण्यात आला आहे. नटराजन यांनी उमेदवारी अर्जाबरोबर सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात एका खटल्याची माहिती कथितपणे दडपल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आल्याने त्यांचा अर्ज बाद केला आहे.

मध्य प्रदेशातील भाजपा नेत्यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसमोर मीनाक्षी नटराजन यांच्या उमेदवारी अर्जाबाबत आक्षेप नोंदवला. भाजपा नेत्यांनी नटराजन यांची उमेदवारी रद्द करण्याची मागणी केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. काँग्रेस उमेदवार नटराजन यांनी अर्ज भरताना सादर कराव्या लागणाऱ्या प्रतिज्ञापत्रात तेलंगणामधील एका प्रलंबित न्यायालयीन खटल्याचा तपशील जाहीर केला नाही, असा आरोप भाजपाने केला होता. दरम्यान, नटराजन यांची उमेदवारी फेटाळल्याने काँग्रेससाठी हा मोठी धक्का मानला जात आहे.

## अब्दुल सत्तारांना धक्का, जिल्हा बँकेच्या निवडणुकीत समीर सत्तार अन् संजना जाधवांचा अर्ज बाद

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)–** संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदासाठी प्राप्त अर्जांची छाननी सोमवारी उशिरापर्यंत सुरू होती. येथे, पालकमंत्री संजय शिरसाट, खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार संजना जाधव, रमेश बोरनारे, समीर सत्तार यांच्यासह १४ जणांच्या अर्जांवर आक्षेप नोंदविण्यात आले. त्यावरील सुनावणी सायंकाळी उशीरा संपली. दरम्यान, या छाननीत अब्दुल सत्तार यांचे चिरंजीव समीर सत्तार यांचा आणि माजी मंत्री रावसाहेब दानवे यांच्य मुलीचा म्हणजे संजना जाधव यांचा अर्ज बाद झाला आहे.

जिल्हा सहकारी बँकेचा निवडणूक कार्यक्रम १ जून रोजी प्रसिद्ध झाला असून पहिल्या दिवसापासूनच अर्ज विक्री आणि स्वीकारण्यास सुरुवात झाली होते. या निवडणुकीत संचालकपदासाठी शुक्रवारपर्यंत एकूण २१४ उमेदवारांजे अर्ज दाखल झाले होते. त्यात, मंत्री, आमदार, खासदारांच्या मुलांसह दिग्गजांच्या अर्जाचा समावेश होता. मात्र, या दिग्गजांपैकी दोन दिग्गज नेत्यांचा धक्का बसला आहे.

## गॅस टंचाईवर भारताचा मेगा प्लॅन तयार

### गुजरात ते ओमानपर्यंत थेट पाईपलाईन, तब्बल ४0 हजार कोटींचा खर्च

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** मध्य पूर्वेतील पुन्हा सुरू झालेला संघर्ष आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील तणावाचा जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होत आहे. दरम्यान, भारताने ओमानच्या सहकार्याने होर्मुझच्या सामुद्रधुनीला वळसा घालणारा एक मार्ग शोधला आहे. भारताला होणारा ऊर्जा पुरवठा विस्कळीत होऊ नये यासाठी, गुजरात आणि ओमान दरम्यान एक लांब पाईपलाईन बांधण्याचा प्रकल्प जाहीर करण्यात आला आहे. ही गॅस पाईपलाइन अरबी समुद्रातून सुमारे २००० किलोमीटर लांब पसरणार आहे. यासाठी ४० लाख कोटींचा खर्च येणार आहे.

जगाच्या सतत बदलणाऱ्या भू-राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, भारताने आपला ऊर्जा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी पावले उचलली आहेत. ओमान-गुजरात खोल समुद्रातील गॅस पाइपलाइन प्रकल्पावर गेल्या ३० वर्षांत अनेक वेळा विचार केला गेला, परंतु त्याचा प्रचंड खर्च, तांत्रिक अडचणी आणि प्रकल्पाच्या फायद्यांबद्दलच्या प्रश्नांमुळे तो नियोजनाच्या पलीकडे कधीच गेला नाही. साऊथ एशिया गॅस एंटरप्राइज अनेक वर्षांपासून या प्रकल्पाचा प्रचार करत आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी प्रस्तावित मार्गासाठी तांत्रिक आणि आर्थिक मूल्यांकन तसेच समुद्रतळाचे सर्वेक्षण आधीच पूर्ण केले आहे.

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजांपैकी बहुतांश गरजा आयात करतो आणि नैसर्गिक वायू, विशेषतः एलएनजीसाठी परदेशी पुरवठ्यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. यापैकी बहुतांश वायू आखाती देशांकडून होर्मुझच्या सामुद्रधुनीमार्गे भारतात येतो. या मार्गात कोणताही व्यत्यय आल्यास त्याचा थेट परिणाम जागतिक ऊर्जा बाजारावर होऊ शकतो.

## विधान परिषद निवडणूक: खा. अशोकराव चव्हाण व अमर राजूरकर यांनी घेतली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट


**नांदेड/ मुंबई (प्रतिनिधी)–** खा. अशोकराव चव्हाण व नांदेड मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांनी मंगळवारी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या आगामी विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट घेण्यात आली.

नांदेडसह राज्यातील सर्व १७ मतदारसंघांमध्ये भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्षांच्या महायुतीचाच विजय होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केल्याची माहिती माजी आमदार अमर राजूरकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.



विधानपरिषदेच्या नांदेडसह राज्यातील १७ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांची निवडणूक प्रक्रिया सध्या सुरू असून, ६ ठिकाणी भाजप-महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. तर, उर्वरित ११ मतदारसंघांमध्ये येत्या १८ जून रोजी मतदान आणि २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण आणि नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील भाजप-महायुतीचे अधिकृत उमेदवार अमरनाथ राजूरकर यांनी मंगळवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली.

याप्रसंगी झालेल्या चर्चेत अमरनाथ राजूरकर यांनी निवडणुकीची तयारी आणि मतदार संपर्क मोहिमेबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्ह्यातील नेते आणि मतदारांकडून मिळणाऱ्या सहकार्याबाबत जाणून घेतले. यावेळी बोलताना शिंदे यांनी राज्यात सर्वत्र भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्रपक्षांच्या महायुतीचे उमेदवार प्रचंड मताधिक्याने विजयी होतील, असा ठाम विश्वास व्यक्त केला.



## शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या माध्यमातून दाम दुपटीचे आमिष; अनेकांना लाखो रुपयांना गंडविले

### शिवाजीनगर ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास अल्पावधीत पैसे दुप्पट करून देण्याचे आमिष दाखवत एका महिलेसह इतरांची तब्बल ३४ लाख ५६ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी शहराच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दि. २३ ऑक्टोबर २०२३ रोजी कोठारी कॉम्प्लेक्स येथील प्रीमियम फिटनेस परिसरात आरोपी संतोषसिंह देविसिंह चंदेल (रा. गोविंदनगर, नांदेड) याने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखविले. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून मीरा नंदकुमार धुळगंडे (वय २७, रा. दीपनगर, नांदेड) यांनी २७ लाख ३६ हजार रुपये गुंतविले.

याशिवाय इतर साक्षीदारांकडूनही पैसे घेण्यात आले. मात्र, गुंतवणुकीवरील परतावा न देता आरोपीने फिर्यादी व इतरांची एकूण ३४ लाख ५६ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ अंतर्गत कलम ३१८ (४) व ३५१(२) (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक कदम करीत असून, आर्थिक फसवणुकीच्या या प्रकरणामुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करताना संबंधित व्यक्तीची विश्वासार्हता व अधिकृतता तपासूनच व्यवहार करावेत, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.




जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# दृष्टीदान : आयुष्यात प्रकाश पेरण्याचा संकल्प

आज १० जून. हा दिवस जगभरात जागतिक दृष्टीदान दिन म्हणून साजरा केला जातो. मानवाच्या शरीरातील प्रत्येक अवयव महत्त्वाचा असला तरी डोळा हा सर्वांत अनमोल आणि संवेदनशील अवयव मानला जातो. कारण डोळे नसतील तर या सुंदर सृष्टीचे अस्तित्वच जाणवू शकत नाही. निसर्गाचे रंग, माणसांचे चेहरे, आईचे ममत्व, मुलांचे हास्य, सूर्याचा उदय आणि चंद्राची शीतलता या सगळ्यांचा आनंद घेण्यासाठी दृष्टी आवश्यक आहे. म्हणूनच दृष्टी असेल तरच सृष्टी ही म्हण अत्यंत समर्पक ठरते. मानव इतर काही अवयव निकामी झाले तरी विविध साधनांच्या मदतीने जीवन जगू शकतो. हात नसला तरी कृत्रिम हातांचा आधार मिळू शकतो, पाय नसला तरी व्हीलचेअर किंवा कृत्रिम अवयवांच्या सहाय्याने पुढे जाता येते. परंतु ज्याच्याकडे दृष्टी नाही, त्या व्यक्तीचे जीवन सततच्या अंधारात अडकून पडते. जन्मांध व्यक्तींवर कोणत्याही प्रकारची शास्त्रीय क्रिया करून त्याला दृष्टीदान देता येत नाही. परंतु नंतर आंधळ्या झालेल्या व्यक्तींना मात्र आपण सहकार्याचा हात देऊ शकतो. अंध व्यक्तीचे दुःख डोळस व्यक्तीला कधीही कळणे शक्य नाही. अशा व्यक्तीला प्रत्येक गोष्टीसाठी दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते. शिक्षण, रोजगार, प्रवास किंवा दैनंदिन जीवनातील साध्या गोष्टींसाठीही संघर्ष करावा लागतो. त्यामुळे दृष्टी गमावणे ही केवळ शारीरिक अडचण नसून मानसिक वेदनाही आहे. आज देशात लाखो लोक कॉर्नियाच्या विकारामुळे अंधत्वाला सामोरे जात आहेत. त्यांच्यासाठी दृष्टीदान हेच आशेचे किरण ठरू शकते. एखाद्या व्यक्तीने मृत्यूपूर्वी डोळेदानाचा संकल्प केला, तर त्याच्या निधनानंतर त्याचे डोळे दुसऱ्या गरजू व्यक्तीला दान केले जाऊ शकतात. या माध्यमातून दोन व्यक्तींना नवीन दृष्टी मिळू शकते. एखाद्याच्या डोळ्यांतून दुसऱ्याला जग पाहण्याची संधी मिळते, यापेक्षा मोठे पुण्य दुसरे कोणते असू शकते? दृष्टीदान म्हणजे केवळ डोळ्यांचे दान नव्हे, तर एखाद्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याचे महान कार्य आहे. अनेक वेळा अज्ञान, अंधश्रद्धा किंवा भीतीमुळे लोक डोळेदान करण्यास पुढे येत नाहीत. काहींना वाटते की मृत्यूनंतर शरीर विद्रूप होईल किंवा धार्मिक अडचणी निर्माण होतील. प्रत्यक्षात तसे काहीही नसते. वैद्यकीय पद्धतीने अत्यंत सन्मानपूर्वक डोळे काढले जातात आणि मृतदेहाच्या स्वरूपात कोणताही बदल होत नाही. अनेक धर्मांनीही अवयवदानाला मानवसेवेचे श्रेष्ठ कार्य मान्यता दिली आहे. म्हणूनच या संदर्भात आज गरज आहे ती समाजात व्यापक जनजागृती निर्माण करण्याची. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि आरोग्य विभाग यांनी दृष्टीदानाबाबत सातत्याने प्रचार करणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपल्या कुटुंबीयांशी याबाबत चर्चा करून मृत्यूनंतर डोळेदान करण्याचा संकल्प करायला हवा. कारण आपला मृत्यू अटळ आहे; मात्र मृत्यूनंतरही आपल्या डोळ्यांतून दुसऱ्याला हे जग पाहण्याची संधी देता येत असेल, तर त्यापेक्षा मोठे मानवसेवेचे कार्य कोणते? जागतिक दृष्टीदान दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून मानवतेचा संदेश देणारा दिवस आहे. मृत्यूनंतरही जगण्याचा हा एक सुंदर मार्ग आहे. आपण जिवंत असताना समाजासाठी जेवढे करता येईल तेवढे करावेच; पण मृत्यूनंतरही आपल्या डोळ्यांच्या माध्यमातून एखाद्याच्या आयुष्यात प्रकाश पेरण्याचा संकल्प प्रत्येकाने करायला हवा. कारण दृष्टीदान म्हणजे अंधारलेल्या आयुष्याला नवजीवन देण्याची पवित्र चळवळ आहे.

# नेत्रदान : प्रकाशाचा अमूल्य वारसा

मानवी शरीरातील प्रत्येक अवयव महत्त्वाचा असला तरी डोळ्यांचे स्थान सर्वाधिक अनन्यसाधारण आहे. डोळे हे केवळ शरीराचा एक अवयव नसून ते ज्ञान, अनुभव, सौंदर्य आणि जगाशी संवाद साधण्याचे माध्यम आहेत. या डोळ्यांमुळेच माणूस निसर्गातील विविध रंग अनुभवतो, आपल्या प्रिय व्यक्तींचे चेहरे पाहतो, शिक्षण घेतो, काम करतो आणि जीवनातील असंख्य आनंदाचे क्षण अनुभवतो. दृष्टी ही मानवाला लाभलेली एक अनमोल देणगी आहे. ज्यांच्या डोळ्यांतून जगाचे दर्शन घडते, त्यांना दृष्टीचे महत्त्व कदाचित नेहमी जाणवत नाही; परंतु ज्यांनी दृष्टी गमावली आहे किंवा ज्यांना जन्मतःच अंधत्व लाभले आहे, त्यांच्यासाठी दृष्टी म्हणजे संपूर्ण आयुष्य बदलून टाकणारी शक्ती असते. अशा लाखो अंध आणि दृष्टीदोषग्रस्त व्यक्तींच्या जीवनात प्रकाश आणण्याची क्षमता नेत्रदानामध्ये आहे. म्हणूनच दरवर्षी १० जून रोजी जागतिक नेत्रदान दिन साजरा केला जातो. हा दिवस केवळ जनजागृतीचा कार्यक्रम नसून मानवतेचा, सामाजिक जबाबदारीचा आणि परोपकाराचा संदेश देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे.

नेत्रदान म्हणजे मृत्यूनंतर एखाद्या व्यक्तीच्या डोळ्यांतील कॉर्निया किंवा नेत्रपटल दान करणे. कॉर्निया हा डोळ्याचा सर्वात बाहेरील पारदर्शक भाग असून तो प्रकाश डोळ्याच्या आत पोहोचवण्याचे काम करतो. कॉर्नियामध्ये दोष निर्माण झाल्यास व्यक्तीला अंशतः किंवा पूर्ण अंधत्व येऊ शकते. आधुनिक वैद्यकीय विज्ञानामुळे अशा रुग्णांवर कॉर्निया प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करून त्यांची दृष्टी पुन्हा मिळवून देता येते. मृत्यूनंतर दान केलेल्या एका व्यक्तीच्या दोन्ही डोळ्यांमधील कॉर्निया दोन वेगवेगळ्या व्यक्तींना उपयोगी पडू शकतात. त्यामुळे एका व्यक्तीच्या नेत्रदानातून दोन अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश निर्माण होऊ शकतो. म्हणूनच नेत्रदानाला महादान असेही म्हटले जाते.

दृष्टी ही व्यक्तीच्या जीवनमानाशी थेट संबंधित असते. एखादी व्यक्ती दृष्टी गमावते तेव्हा तिच्या जीवनातील अनेक शक्यता मर्यादित होतात. शिक्षण, रोजगार, प्रवास, सामाजिक संबंध आणि दैनंदिन जीवनातील अनेक कामे कठीण बनतात. अंधत्वामुळे व्यक्तीला मानसिक, सामाजिक आणि आर्थिक समस्यांनाही सामोरे जावे लागते. अनेकदा कुटुंबातील इतर सदस्यांवरही त्याचा परिणाम होतो. अशा परिस्थितीत नेत्रदानाद्वारे मिळालेली दृष्टी केवळ एका व्यक्तीच्या डोळ्यांमध्ये प्रकाश आणत नाही, तर त्याच्या संपूर्ण जीवनात आशेची नवी पहाट निर्माण करते. त्यामुळे नेत्रदान हे केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून मानवतेचे श्रेष्ठ उदाहरण आहे.

जगभरात अंधत्व ही एक गंभीर आरोग्य समस्या मानली जाते. विविध आंतरराष्ट्रीय अभ्यासांनुसार कोट्यवधी



लोक काही ना काही प्रकारच्या दृष्टीदोषाने ग्रस्त आहेत. त्यापैकी लाखो लोक कॉर्नियाच्या आजारांमुळे अंधत्व अनुभवत आहेत. अनेकांना कॉर्निया प्रत्यारोपणाची गरज असते; परंतु दानासाठी उपलब्ध होणाऱ्या कॉर्नियांची संख्या अत्यल्प असल्यामुळे हजारो रुग्ण प्रतीक्षा यादीत राहतात. भारतामध्येही ही समस्या मोठ्या प्रमाणावर आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात अंधत्व आणि दृष्टीदोषाचे प्रमाण मोठे असून कॉर्नियाच्या अंधत्वामुळे अनेक व्यक्तींचे जीवन प्रभावित झाले आहे. देशभरात दरवर्षी लाखो कॉर्नियांची आवश्यकता असताना प्रत्यक्षात उपलब्ध होणाऱ्या नेत्रांची संख्या त्यापेक्षा खूपच कमी आहे. ही तफावत दूर करण्यासाठी व्यापक जनजागृतीची आवश्यकता आहे.

भारतातील नेत्रदान चळवळीचा इतिहास प्रेरणादायी आहे. विसाव्या शतकाच्या मध्यापासून नेत्रदान आणि कॉर्निया प्रत्यारोपणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती झाली. विविध वैद्यकीय संस्था, नेत्ररोगतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वयंसेवी संस्थांनी नेत्रदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. देशातील अनेक शहरांमध्ये आय बँकांची स्थापना करण्यात आली. आय बँक म्हणजे नेत्रदानातून प्राप्त झालेले कॉर्निया सुरक्षित ठेवण्याची, त्यांची तपासणी करण्याची आणि योग्य रुग्णांना उपलब्ध करून देण्याची व्यवस्था होय. या संस्थांमुळे नेत्रदान आणि प्रत्यारोपण प्रक्रिया अधिक प्रभावी बनली आहे. तरीही लोकसंख्येच्या तुलनेत नेत्रदानाचे प्रमाण वाढविण्याची गरज कायम आहे.

जागतिक नेत्रदान दिनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे समाजामध्ये नेत्रदानाबाबत जागरूकता निर्माण करणे. अनेक लोकांना नेत्रदानाची प्रक्रिया, त्याचे फायदे आणि त्यामागील वैज्ञानिक सत्य यांची माहिती नसते. त्यामुळे विविध शासकीय संस्था, आरोग्य विभाग, वैद्यकीय महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्था या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. जनजागृती रॅली, व्याख्याने, चर्चासत्रे, नेत्रतपासणी शिबिरे, निबंध स्पर्धा आणि सामाजिक माध्यमांवरील मोहिमा यांद्वारे लोकांपर्यंत संदेश पोहोचविला जातो. या उपक्रमांमुळे समाजामध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत होते. ग्रामीण भारतामध्ये नेत्रदानाविषयी जागरूकतेचा अभाव तुलनेने अधिक आहे. अनेक गावांमध्ये आय बँकांची माहिती उपलब्ध नसते. काही ठिकाणी अंधश्रद्धा आणि गैरसमज अधिक प्रमाणात आढळतात. त्यामुळे ग्रामीण भागात विशेष मोहिमा राबविण्याची गरज आहे. आशा सेविका, अंगणवाडी कार्यकर्त्या, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक आणि स्थानिक स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून जनजागृती वाढविता येऊ शकते. ग्रामीण समाजामध्ये विश्वासार्ह स्थान असलेल्या व्यक्तींनी नेत्रदानाचा प्रचार केल्यास त्याचा अधिक परिणाम होऊ शकतो.

शिक्षण क्षेत्राची भूमिकाही या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना नेत्रदानाविषयी माहिती देणे आवश्यक आहे. युवक वर्ग हा समाजातील परिवर्तनाचा प्रमुख घटक आहे. जर तरुण पिढीने नेत्रदानाचा स्वीकार केला, तर भविष्यात नेत्रदानाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढू शकते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करून अंधश्रद्धा दूर करण्याचे काम शिक्षण संस्थांमार्फत प्रभावीपणे करता येते.

प्रसारमाध्यमे ही जनजागृतीची प्रभावी साधने आहेत. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि डिजिटल माध्यम इंद्वारे नेत्रदानाविषयी माहिती व्यापक प्रमाणात पोहोचविता येते. यशस्वी कॉर्निया प्रत्यारोपण झालेल्या व्यक्तींच्या कथा समाजापर्यंत पोहोचवल्यास लोकांमध्ये प्रेरणा निर्माण होते. एखाद्या व्यक्तीने पुन्हा आपल्या आई-वडिलांचा चेहरा पाहिला, आपल्या मुलांना पाहिले किंवा अनेक वर्षांनंतर निसर्गाचा अनुभव घेतला, अशा कथा लोकांच्या मनाला स्पर्श करतात आणि नेत्रदानाबाबत सकारात्मक विचार निर्माण करतात.

नेत्रदानाचा निर्णय वैयक्तिक असला तरी त्याची अंमलबजावणी कुटुंबाच्या सहकार्यावर अवलंबून असते. अनेक वेळा व्यक्तीने नेत्रदानाचा संकल्प केलेला असतो; परंतु मृत्यूनंतर कुटुंबीयांना त्याची माहिती नसल्यामुळे दान होऊ शकत नाही. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या कुटुंबीयांशी या विषयावर चर्चा करणे आवश्यक आहे. मृत्यूनंतर आपले नेत्र दान करण्याची इच्छा स्पष्टपणे व्यक्त करणे गरजेचे आहे. अशा संवादामुळे कुटुंबीयही या निर्णयाचा सन्मान करण्यास तयार होतात. समाजातील प्रसिद्ध व्यक्तींची भूमिका देखील महत्त्वाची आहे. कलाकार, साहित्यिक, क्रीडापटू, सामाजिक कार्यकर्ते आणि धार्मिक नेते यांनी नेत्रदानाचा संदेश दिल्यास त्याचा व्यापक प्रभाव पडतो. अनेक लोक आपल्या आदर्श व्यक्तींचे अनुकरण करतात. त्यामुळे सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी नेत्रदानाविषयी खुलेपणाने भूमिका मांडणे आवश्यक आहे. त्यांच्या सहभागामुळे जनजागृती मोहिमांना अधिक बळ मिळू शकते.

नेत्रदान आणि मानवता यांचा अतूट संबंध आहे. माणूस आपल्या आयुष्यात अनेक प्रकारे समाजासाठी योगदान देतो; परंतु मृत्यूनंतरही समाजाच्या सेवेसाठी काहीतरी देऊन जाण्याची संधी फार कमी क्षेत्रांमध्ये उपलब्ध असते. नेत्रदान ही अशीच एक संधी आहे. जीवनाचा शेवट हा दुसऱ्या कोणाच्या नव्या सुरुवातीचे कारण ठरू शकतो. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिचे नेत्र दोन अंध व्यक्तींना प्रकाश देऊ शकतात, ही कल्पनाच किती प्रेरणादायी आहे.

जागतिक नेत्रदान दिन हा आपल्याला आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे. दृष्टी ही जीवनातील अमूल्य संपत्ती आहे आणि ती दुसऱ्याला देण्याची संधी नेत्रदानामध्ये आहे. आपण जिवंत असताना समाजासाठी जे काही करतो, त्यापलीकडे जाऊन मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याची ताकद या दानामध्ये आहे. त्यामुळे नेत्रदान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नाही, तर ती मानवतेचा उत्सव आहे. मानवजातीच्या इतिहासात दान, त्याग आणि परोपकार यांना नेहमीच सर्वोच्च स्थान मिळाले आहे. नेत्रदान ही त्या परंपरेची आधुनिक अभिव्यक्ती आहे. एखाद्या अंध व्यक्तीच्या डोळ्यांत पुन्हा प्रकाश निर्माण करणे, त्याला स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची संधी देणे यापेक्षा मोठी मानवसेवा कोणती असू शकते? म्हणूनच प्रत्येकाने नेत्रदानाचा गांभीर्याने विचार करावा. आपल्या कुटुंबीयांशी याबाबत चर्चा करावी आणि समाजामध्येही या विषयाची जागरूकता वाढवावी.

अखेरीस असे म्हणता येईल की, नेत्रदान म्हणजे मृत्यूनंतरही जिवंत राहण्याचा एक सुंदर मार्ग आहे. शरीर नश्वर असले तरी आपल्या नेत्रांमधून निर्माण झालेला प्रकाश अनेक वर्षे दुसऱ्यांच्या आयुष्यात झळकत राहू शकतो. अंधाराने वेढलेल्या एखाद्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणे, हीच नेत्रदानाची खरी ताकद आहे. जागतिक नेत्रदान दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया की दृष्टीचा हा अमूल्य वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि अंधत्वमुक्त समाज घडविण्यासाठी नेत्रदानाचा संदेश प्रत्येक घरापर्यंत नेऊया. कारण मृत्यूनंतरही जर आपले डोळे कोणाच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणार असतील, तर त्यापेक्षा मोठे दान आणि त्यापेक्षा मोठी मानवसेवा दुसरी कोणतीच असू शकत नाही.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली

# भौतिक साधनांच्या पाठलागाने माणूस सुखाला पारखा

आपला देशच नव्हे तर संपूर्ण जगाचाच, सर्वच बाबतीत झपाट्याने विकास होत आहे. म्हणजेच माणसाला हवी असलेली साधने जसे की, लौकिक सुखे, संतती, संपत्ती, आरोग्य, शिक्षण, सत्ता, प्रसिध्दी इत्यादी भरपूर प्रमाणात उपलब्ध झालेली आहेत. त्यातही विषमता आढळून येतेच हे अगदी नैसर्गिकच आहे असे म्हणता येईल. प्रत्येकच व्यक्तीला सारख्या प्रमाणात मिळणे कठीणच असते. त्या त्या व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वावर अवलंबून असते. परंतु ज्या व्यक्तीजवळ वरील सर्व साधने उपलब्ध असली तरी, सुद्धा ती व्यक्ती समाधानी राहू शकत नाही. तसे सामान्यपणे प्रत्येकच व्यक्ती समाधानी राहू शकत नाही.

प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक साधने मिळतीलच असे काही नाही. ते त्यांच्या कर्तबगारीवर अवलंबून असते. ज्यांच्याकडे ही साधने नाहीत त्या व्यक्ती ते मिळवण्यासाठी संघर्ष करत असतात, आणि ते मिळवण्याचे प्रयत्न करतात. त्यांचे हे प्रयत्न कधीच संपत नाहीत. सतत सुरुच असतात. ते मिळवण्यासाठी प्रसंगी त्या व्यक्ती अवैध मार्गाचा वापर सुध्दा करण्यास मागेपुढे पाहत नाहीत, आणि यामुळे आपल्या माणसांना क्षती पोहचेल यांचा विचार सुद्धा त्यांच्या मनाला शिवणार नाही. त्यांची ही धडपड कुठेच थांबत नाही. आपले जुने लोक म्हणतात की, अती तेथे माती म्हणजेच प्रत्येक गोष्टीला काही मर्यादा असतात, आणि त्याचे प्रमाण अती झाल्यास ती बाब लवकरच संपुष्टात येईल. म्हणून प्रत्येक व्यक्तीने कुठेतरी थांबणे गरजेचे असते. तात्पर्य हेच की, वरीलप्रमाणे दर्शविलेली सर्व साधणे ही मानवी सुखासाठी किंवा समाधानी जीवनासाठी आहेत. तर मग संपूर्ण हयात जर ते मिळविण्यासाठी खर्ची घालावी लागत असेल तर त्याचा मला काय फायदा? त्यापासून मला कोणते किंवा किती सुख मिळाले? त्यामुळे मी किती समाधानी आहे? या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा विचार करणे गरजेचे आहे.

या संघर्षाच्या, धडपडीच्या चक्रातून माणसाची सुटका व्हावी. त्याने संपादित केलेल्या साधनांपासून त्याला सुख उपभोगता यावे किंवा त्यापासून समाधान मिळावे यासाठी पूर्वीच्या काळात आश्रम व्यवस्थेप्रमाणे जीवन जगत होते. सुरुवातीचा काळ ब्रम्हचार्याश्रम असे. या काळात साधारणपणे लोक विद्यार्जन करत. जी विद्या पुढे गृहस्थाश्रमामध्ये उपयोगी पडेल अशी विद्या किंवा शिक्षण ग्रहण करत असत, आणि याच काळात ब्रम्हचार्याचे कडक पालन केले जात होते. त्यामुळे हल्लीसारखे विकृत प्रकार फारच कमी होते. ब्रम्हचार्यावस्थेमधून पुढे गृहस्थाश्रमाकडे पदार्पण होत असे. या आश्रमावस्थेमध्ये मनुष्य सर्व भौतिक साधनांचा मनसोक्त उपभोग घेत होता. याच काळात अर्थार्जन किंवा हवी असलेली साधने मिळविण्याचे कार्यही सुरू रहात असे, आणि त्याच्यासोबत त्यांचा उपभोग घेणेही सुरू रहात असे. पुढे वानप्रस्थाश्रम म्हणजे सगळ्या कामातून निवृत्तपणे प्राप्त साधनांचा उपभोग घेत समाधानी जीवन जगणे. त्यापुढील काळ म्हणजे संन्यासाश्रम, या काळात मनुष्य सर्व ऐहिक साधनांचा त्याग करून संन्यस्थ जीवन जगत होता. या काळात त्याला कोणत्याही ऐहिक साधनांची आसक्ती रहात नसे. म्हणजेच त्यांना कोणतेही साधने आपल्याकडे नाहीत यांचे दुःख करण्याचे कारणच उरत नसे.

तात्पर्य हेच की, वेगवेगळे कार्य करण्यासाठी, मनुष्य जीवनाचे वेगवेगळे टप्पे ठरलेलेच होते. त्यामुळे त्यांना कोणत्याच गोष्टींसाठी दुःख करण्याची गरजच भासत नव्हती. हल्ली मनुष्य फक्त भौतिक सुविधा किंवा साधने संपादन करण्यात आयुष्यातील बराचसा कालावधी घालवतो. त्याला कुठेच थांबावेसे वाटत नाही. आयुष्याच्या शेवटी शेवटी नाईलाजाने का होईना त्याला थांबावेच लागते. या काळातही तो त्या उपलब्ध साधनांचा मनसोक्त आनंद घेऊ



शकत नाही. कारण की, मिळविलेल्या सर्व साधनांच्या सुरक्षेच्या चिंतेने ग्रासलेला असतो. तो तेव्हाही समाधानी नव्हता आणि आताही समाधानी किंवा सुखी रहात नाही. एवढं सगळं मिळवण्यासाठी तुम्ही तुमचं आयुष्य खर्ची घातलं, आणि तुम्हाला कुठेही सुख किंवा समाधान मिळालं नाही तर एवढा खटाटोप कशासाठी? या प्रश्नाच्या उत्तराचा विचार करून माणसानं कुठेतरी थांबणे गरजेचे आहे.

**-रामदास राजेगावकर**
मेहकर, जि. बुलडाणा.
मो.९४२०२३३०३२.

# जागतिक नेत्रदान दिन



आज १० जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे.

शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे. त्यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यात १० जून १९२४ रोजी झाला. घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या. १० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले. या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे.

आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्यांशिवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांद्वारे आपल्याला ७५ टक्के ज्ञान मिळते. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो. काही असेही दुर्दैवी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो. त्यांना दृष्टीच नसते. जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात. जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे. अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करुन त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे.

भारतामध्ये असलेल्या कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर करावे. हे नेत्रदान चष्मा असणारे, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले तसेच मधुमेह आणि मानसिक त्रास असलेले व्यक्तीही करू शकतात. नेत्रदान करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी जवळच्या नेत्रपेढीत जाऊन नेत्रदानाची नोंद करावी. मृत व्यक्तीने नेत्रदानाची नोंद केली नसली तरी त्या व्यक्तीच्या वारसदारांनी इच्छा व्यक्त केली तरी त्या व्यक्तीचे नेत्रदान होऊ शकते. मृत्यूनंतर जास्तीतजास्त सहा तासाच्या आत नेत्रदान होऊ शकते. ज्या व्यक्तीला नेत्रदानासाठी कॉर्नियाचा वापर करायचा आहे त्याला चोवीस तासाच्या आत कॉर्नियाचे प्रत्यारोपण करणे गरजेचे असते.

नेत्रदानाचा अर्थ शरीरातून संपूर्ण डोळा काढून घेणे असा होत नाही. यात मृत व्यक्तीच्या डोळ्याचा कॉर्नियाचा वापर करण्यात येतो. एका मृत्यू झालेल्या व्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन तर प्रकाशमान होतेच पण मृत व्यक्ती मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहू शकते. आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# वाहनावरील वेग आवरायला हवा...

आजच्या धावपळीच्या आणि आधुनिक युगात वाहनांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. वाहनामुळे प्रवास सोपा आणि जलद झाला असला तरी वेगावर नियंत्रण नसल्यास अपघात होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे वाहन चालवताना वेग आवरणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

वेळेची बचत, कामाचा ताण आणि स्पर्धेची भावना यामुळे अनेकजण वाहन वेगाने चालवतात. परंतु वाहनावरील वेगावर नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. कारण वेग वाढला की अपघाताचा धोका देखील वाढतो. त्यामुळे सुरक्षिततेसाठी वाहन चालवताना वेगावर नियंत्रण असणे गरजेचे आहे. वेगावर योग्य नियंत्रण असणे आपली सुरक्षितता वाढवते, अपघातांची शक्यता कमी करते आणि इतर प्रवाशांची तसेच पादचाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करते.

वाहनाचा वेग नियंत्रित न ठेवल्यास अनेक गंभीर परिणाम होतात. सर्वप्रथम, वाहनावरील नियंत्रण सुटू शकते. अचानक समोर एखादी व्यक्ती किंवा वाहन आल्यास गाडी वेळेवर थांबवता येत नाही. त्यामुळे अपघात होतात. अनेकदा अशा अपघातांत लोक जखमी होतात किंवा त्यांचा मृत्यू होतो. आजकाल अनेकांना वेळेची घाई असते, पण त्यामधून वाहन चालवताना वेग वाढवणे हा उपाय नाही. जास्त वेगात वाहन चालवणे अपघातांचे प्रमाण वाढते. रस्त्यावर फक्त आपण नसतो, पादचारी, सायकलस्वार, दुसरी वाहने सगळ्यांचं रक्षण ही आपलीही जबाबदारी असते. नियोजनबद्ध प्रवास करा. वेळे आधी निघा. वेग ही शान नाही, शहाणपण आहे हे लक्षात ठेवा. स्पीड लिमिटचं पालन करून आपण आपली आणि इतरांची सुरक्षितता सुनिश्चित करता येते. आपली जागरूकता आणि काळजी घेऊन आपण सर्वांनाच सुरक्षिततेची पर्वा करू शकतो. सावकाश चला, सुरक्षित राहा हा संदेश आपण सर्वांनी आचरणात आणला पाहिजे.

**-श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मान्सूनपूर्व पावसावर पेरणीची घाई करू नये

## दुबार पेरणीचे संकट टाळण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** खरीप हंगाम २०२६ मध्ये संभाव्य 'अल-निनो'च्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सध्या जिल्ह्यात मान्सूनपूर्व पाऊस सुरू असला तरी त्याचे स्वरूप वादळी-वाऱ्यासह अधूनमधून पडणाऱ्या सरींचे असल्याने शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.



१ जूनपासून जिल्ह्यात सरासरी चार पावसाचे दिवस नोंदविण्यात आले असून, सरासरी २८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा 'अल-निनो'चा प्रभाव राहण्याची शक्यता असल्याने पावसात मोठा खंड पडू शकतो. त्यामुळे दुबार पेरणीचे संकट टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण होईपर्यंत, म्हणजे किमान ८० ते १०० मिमी पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

अपुऱ्या पावसाच्या आधारे पेरणी केल्यास बियाण्यांची उगवण बाधित होऊन दुबार पेरणीची वेळ येऊ शकते. त्यामुळे कृषी विभागाच्या शिफारशी व स्थानिक परिस्थितीनुसारच पेरणीचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन मिळावे यासाठी प्रत्येक गावातील सहायक कृषी अधिकारी गावनिहाय व्हॉट्सप गट आणि इतर संपर्क माध्यमांद्वारे पेरणीबाबत सल्ला देत आहेत. सर्व शेतकरी बांधवांनी आपल्या गावातील शेतकरी व्हॉट्सप गटांमध्ये सहभागी व्हावे तसेच 'महाविस्तार' ॲप डाउनलोड करून कृषीविषयक अद्ययावत माहितीचा लाभ घ्यावा, असेही कृषी विभागाने म्हटले आहे.

पेरणीपूर्वी बियाण्यांची उगवणक्षमता स्वतः तपासून पाहावी. तसेच शिफारशीनुसार बीजप्रक्रिया करूनच पेरणी केल्यास पिकांची गुणवत्ता आणि उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होईल, असे कृषी तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

अधिक माहितीसाठी संबंधित सहायक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

# अल-निनोच्या जनजागृतीसाठी कृषी विभागाच्या गावोगावी १३ हजार गाव बैठकांचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** उत्पन्न आणि उत्पादनाच्या दृष्टीने खरीप हंगाम अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मान्सूनच्या अनिश्चिततेमुळे पिकांवर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी कृषी विभागाने जनजागृती मोहिमेला वेग दिला आहे. यंदा मान्सूनवर 'अल-निनो'चा प्रभाव पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केल्याने शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यावर भर दिला जात आहे.

नांदेड जिल्ह्यात आतापर्यंत सुमारे १३ हजार जनजागृती मोहिमा राबविण्यात आल्या असून, एका सहायक कृषी अधिकाऱ्याने सरासरी ३७ मोहिमा पूर्ण केल्या आहेत. या मोहिमा पुढेही सुरू राहणार असून, त्यात जास्तीत-जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

कृषी विभागाच्या नियोजनानुसार प्रत्येक सहायक कृषी अधिकाऱ्याने किमान ५० मोहिमा घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच पेरणीपासून काढणीपर्यंतच्या सर्व टप्प्यांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे अनिवार्य करण्यात आले आहे. पेरणीपूर्व काळात प्रत्येक सहायक कृषी अधिकाऱ्याने दोन कार्यशाळांचे आयोजन केले आहे.

गेल्या वर्षी खरीप पिके अंतिम टप्प्यात असताना अतिवृष्टी आणि सततच्या पावसामुळे उत्पादनात घट झाली होती. यंदा पेरणीपूर्वीच 'अल-निनो'चे संकट निर्माण होण्याची शक्यता असल्याने कृषी विभाग अधिक सतर्क झाला आहे. संभाव्य परिणामांना तोंड देण्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने विविध मोहिमा आणि कार्यशाळा आयोजित केल्या जात आहेत.

या कार्यशाळांचे आयोजन गावांमध्ये लोकप्रतिनिधींच्या सहभागाने सकाळी किंवा रात्री केले जात आहे. विभागीय कृषी सहसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी आणि सहायक कृषी अधिकारी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेत आहेत.

बदलत्या हवामानाचा विचार करून पीक नियोजन, पीक पद्धतीतील बदल, पाणी व्यवस्थापन आणि इतर आवश्यक कृषी उपाययोजनांबाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. कृषी विभागाच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना संभाव्य हवामान बदलांचा सामना करण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**मोहिमांचे स्वरुप काय ?**

शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य नियोजनाची जोड मिळावी याकरिता कृषी विभागाकडून प्रयत्न केले जात आहेत. यामध्ये पेरणीपूर्व मोहीम व पेरणी पश्चात मोहिमेचा समावेश आहे.

पेरणी पुर्व मोहीम :- माती परीक्षणाच्या आधारे कृषी निविष्ठाच्या वाजवी वापरासाठी मोहीम, टंचाई परिस्थितीत फळबागा वाचविणे व फळबाग लागवडीमध्ये सीआरए तंत्रज्ञानाचा वापर, अल निनो बाबत जागरुकता करणेसाठी शिवार फेरीचे आयोजन, घरगुती चाचणी पद्धतीने बियाण्यांची उगवणक्षमता तपासणी प्रात्यक्षिक मोहीम, बीज प्रक्रिया मोहीम, बीबीएफद्वारे उताराला आडवी पेरणीचा प्रचार व प्रसार करणे, सापळा पिकांची लागवड बाबत प्रचार व प्रसार करणे, शून्य/कमी मशागत पद्धत अवलंब करणे, खरीप हंगाम तयारी व प्रमुख खरीप पिकांच्या तंत्रज्ञान प्रसारासाठी गावनिहाय प्रशिक्षण, पाणी फौंडेशन डिजिटल शेतीशाळा बाबत प्रचार व प्रसिद्धी, मग्रारोहयो अंतर्गत फळबाग लागवड प्रचार व प्रसिद्धी, महाविस्तार ॲप व कृषीविषयक माहिती तंत्रज्ञानाच्या साधने बाबत प्रचार व प्रसिद्धी.

**पेरणी पश्चात मोहीम :-** हिरवळीच्या खतांची निर्मिती, बायोफर्टीलायझर, बायोपेस्टीसाईड निर्मितीसाठी शेतावर फार्म लॅब स्थापन, निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, निमास्त्र, ब्रह्मास्त्र, जीवामृत, बिजामृत, घनजीवामृत यांसारख्या जैविक निविष्ठा निर्मिती करणेबाबत प्रचार प्रसिद्धी करणे, ऊस पाचट व्यवस्थापन, हुमणी कीड एकात्मिक व्यवस्थापन मोहीम, शंखी गोगलगाय निर्मुलन जनजागृती मोहीम, बोंड अळी एकात्मिक व्यवस्थापन मोहीम तसेच कार्यशाळा गावोगावी आयोजित करण्यात येत आहेत.

# विजय आधी मनात, नंतर रणात होतो -शिवाजीराजे पाटील



**नांदेड (प्रतिनिधी)–** कुठल्याही स्पर्धा परीक्षेची लढाई लढताना विजय आधी मनात नंतर रणात होत असतो, हे सूत्र कायम लक्षात ठेवावे. नीट क्वालिफाय होकर डॉक्टर बनना आपकी जरुरत नहीं, जुनून होना चाहिए. जरुरते सिर्फ पेट पालती है, लेकिन जुनून इतिहास रचता है. आईवडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वस्व झोकून देणारेच नीट क्वालिफाय होतात, असे प्रतिपादन सुप्रसिध्द मोटिव्हेशनल स्पिकर इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी केले आहे.

सोमवार, दि. ८ जून रोजी कोनाळे कोचिंग क्लासेसच्या वतीने नीट २०२८ बॅचच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना इंटरनॅशनल माईंड पॉवर ट्रेनर शिवाजीराजे पाटील बोलत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तानाजी भोसले तर आभार प्रदर्शन योगेश कन्हेरे यांनी केले.

नीट ओरिएंटेशन या एक तासाच्या सत्रात शिवाजीराजे पाटील यांनी दोन वर्षांच्या नीट प्रवासाचे कांगोरे उलगडले. आनंदी मनाने खाल्लेले अन्न अंगी लागते. त्याप्रमाणेच आनंदाने केलेला अभ्यासच अपेक्षित रिझल्ट देऊ शकतो. इस्ट ऑर वेस्ट केसिसी इज बेस्ट. कोनाळे कोचिंग क्लासेसच्या टिमने सातत्याने राखलेल्या देदीप्यमान निकालांच्या परंपरेचे त्यांनी अभिनंदन केले. विद्यार्थीदशेत आहार, विहार व विचारांवर नियंत्रण ठेऊन स्क्रीन टाईम शून्य ठेवण्याचे आवाहन शिवाजीराजे पाटील यांनी विद्यार्थी मित्र-मैत्रिणींना केले.

# दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ आढळल्यास कठोर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील दूध उत्पादक, विक्रेते, सहकारी व खासगी दुग्ध प्रकल्प, दुग्धजन्य पदार्थ उत्पादक तसेच संबंधित दुकानदारांची जिल्हास्तरीय पथकामार्फत तपासणी करण्यात येणार असून, तपासणीत भेसळ आढळल्यास संबंधितांविरुद्ध गुन्हा (एफआयआर) दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा समितीचे अध्यक्ष यांनी दिले आहेत.

दूध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी तथा समितीचे अध्यक्ष डॉ. रत्नदीप गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली २ जून २०२६ रोजी दूध भेसळ प्रतिबंधक समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत जिल्ह्यातील भेसळीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची स्थापना करण्यात आली.

समितीच्या माध्यमातून विशेष पथके तयार करून जिल्ह्यातील विविध दूध संकलन केंद्रे, दुग्ध प्रकल्प, विक्री केंद्रे आणि दुग्धजन्य पदार्थ विक्रेत्यांची तपासणी केली जाणार आहे. तपासणीदरम्यान दूध व दुग्धजन्य पदार्थांचे नमुने घेऊन त्यांची गुणवत्ता आणि शुद्धता तपासली जाणार आहे.

भेसळमुक्त व सुरक्षित अन्नपदार्थ नागरिकांपर्यंत पोहोचावेत, या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# ज्ञानभारत अभियानासाठी हस्तलिखित ग्रंथ, पोथ्या व दुर्मिळ साहित्याची माहिती डिजिटल स्वरूपात संकलित होणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारताच्या समृद्ध हस्तलिखित वारशाचे जतन, संवर्धन आणि डिजिटायझेशन करण्यासाठी केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयामार्फत 'ज्ञानभारतम' ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत 'हर घर दस्तक' संकल्पनेनुसार घराघरांत उपलब्ध असलेल्या हस्तलिखित ग्रंथ, पोथ्या आणि तत्सम साहित्याची माहिती संकलित केली जाणार असून, नागरिकांनी या राष्ट्रीय उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

सचिव, सांस्कृतिक विभाग व मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या १५ एप्रिल २०२६ रोजीच्या पत्रानुसार या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या 'ज्ञानभारतम' योजनेचा उद्देश देशातील हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन आणि व्यापक प्रसार करणे हा आहे.

या उपक्रमाअंतर्गत शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने देशभरातील एक कोटीपेक्षा अधिक हस्तलिखितांचा संग्रह करण्याचे लक्ष्य केंद्र शासनाने निर्धारित केले आहे. भारताच्या ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस आहे.

या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी भारत सरकारने "Gyan Bharatam' हे विशेष मोबाईल ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून नियुक्त सर्वेक्षकांना विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, मंदिरे, मठ, ग्रंथालये आणि इतर अभिरक्षक संस्थांमधील हस्तलिखित संग्रहांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरण करणे सुलभ होणार आहे.

'हर घर दस्तक' अभियानांतर्गत गावपातळीवर घराघरांशी संपर्क साधून वैयक्तिक संग्रहातील हस्तलिखित पोथ्या, ग्रंथ आणि इतर हस्तलिखित साहित्याची माहिती संकलित केली जाणार आहे. संबंधित साहित्याची माहिती "Gyan Bharatam' मोबाईल पवर स्कॅन करून अपलोड करण्यात येणार आहे.

# मोटारसायकल वाहनांसाठी नवीन मालिका सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)–** परिवहनेत्तर संवर्गातील मोटार- सायकल वाहनांसाठी MH26-DC ही नवीन मालिका लवकरच सुरू होणार आहे. ज्या अर्जदारांना पसंती क्रमांक घ्यावयाचा आहे त्यांचे (आधारकार्ड, पॅनकार्ड, मोबाईल नंबर व ईमेलसह) अर्ज बुधवार, दि. १० जून २०२६ रोजी दुपारी २.३० पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. या अर्जासोबत संबंधित पसंती क्रमांकाच्या शुल्काचा धनादेश (डी.डी) सुध्दा सादर करावा. मुदतीनंतर व वेळेनंतर पसंती क्रमांकासाठी अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

ज्या पसंती क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास १० जून २०२६ रोजी दुपारी ४ वा. दूरध्वनीद्वारे संबंधित अर्जदारास कळविण्यात येईल. जिल्ह्यातील सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# लोह्यात आर्य वैश्य समाजाने दिले धोंडे जेवण



**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा शहरातील शिवकल्याणनगर येथील श्री गोविंदराज मंगल कार्यालयात अधिक मासानिमित धोंडे जेवणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

लोहा शहरातील आर्य वैश्य समाजाच्यावतीने विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. सध्या मे २०२६ मध्ये अधिकमासाचा महिना आला असल्यामुळे लोहा शहरातील आर्य वैश्य समाज बांधव एकत्रीत येऊन त्यांनी दि. ७ मे २०२६ रोजी लोहा शहरातील श्री गोविंदराव मंगल कार्यालयात धोंडे जेवणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी स्वादिष्ट रसाळीचे जेवण देण्यात आले.

या धोंडे जेवण कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून युवानेते सचिन पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, नगरसेवक हरीभाऊ चव्हाण, अविनाश पाटील पवार, गणेश पाटील बगाडे, तुकाराम दाढेल, सदा तेलंग, सतीश निखाते, उद्योजक ज्ञानोबा पाटील पवार, संभाजी पाटील चव्हाण, राजेश मुकादम आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित प्रमुख पाहुण्यांचा आर्य वैश्य समाजाच्यावतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी लोहा न. प.चे माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष दिनेश तेललवार, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नामदेव कटकमवार, बांधकाम समिती उपाध्यक्ष सूर्यकांत कोटगिरे, लक्ष्मीकांत बिडवई, उद्योजक तुकाराम सावकार, कोटलवार, विजय कटकमवार, नगरसेवक शंकर वट्टमवार, लक्ष्मीकांत बच्चेवार, बालाजी कोटगिरे, शंकर उत्तरवार, विजय तेललवार पत्रकार, शुभम उत्तरवार, दीपक रूद्रवार, राम वट्टमवार, सदानंद पालीमकर, ऋषी तेललवार, संकेत मोतेवार, बंडू कटकमवार, नागेश दमकोंडवार, स्वप्नील दमकोंडवार, पंकज मोटरवार, सुदन वट्टमवार, चंद्रकांत दमकोंडवार, भूषण दमकोंड़वार, यश पातेवार, सचिन महाजन, शुभम पातेवार, विनोद पारसेवार, सोहम चन्नावार, विकास पातेवार, पांडुरंग रहाटकर यांच्यासह समाजबांधवांनी परिश्रम घेतले.

# 'कपास क्रांती' प्रात्यक्षिकांसाठी शेतकरी गट व संस्थांनी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, कापूस पिकाची उत्पादकता व गुणवत्ता सुधारणे तसेच आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने नवनिर्मिती केंद्र पुरस्कृत कापूस उत्पादकता अभियान (कपास क्रांती) MCP योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत विविध पीक प्रात्यक्षिके आयोजित करण्यात येत असून, पात्र शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्थांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

यंदा संभाव्य अल-निनो परिस्थितीचा विचार करून कपाशीची लागवड बेड पद्धतीने करणे तसेच मूलस्थानी जलसंधारण उपाययोजना राबविण्यावर भर देण्यात आला आहे.

# जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत नवीन सेवार्थ प्रणाली ई-बील संदर्भात प्रशिक्षण

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत नवीन सेवार्थ प्रणाली संदर्भात प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन नांदेड तालुक्यातील आहरण व संवितरण यांच्यासाठी बुधवार, दि. १० जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे.

तसेच नांदेड वगळता सर्व तालुक्यातील आहरण व संवितरण अधिकारी यांचे अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी गुरुवार, दि. ११ जून २०२६ रोजी सकाळी ११ वा. जिल्हा नियोजन भवन नांदेड येथे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संबंधित लेखा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या प्रशिक्षणास उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी श्रीमती शोभा मुंडे यांनी केले आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमात नवीन सेवार्थ प्रणालीच्या कार्यपद्धती, अद्ययावत वैशिष्ट्ये तसेच व्यवहारातील अंमलबजावणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण श्रीमती वैशाली ताटापल्लेवार, अप्पर कोषागार अधिकारी व अप्पर कोषागार अधिकारी नामदेव राठोड तसेच नियुक्त मास्टर ट्रेनर कनिष्ठ लेखापाल शंकर दुमाने, लेखा लिपीक प्रमोद शिंदे, बसवेश्वर वाळके, सुनिल संगेवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडणार आहे. संबंधीत सर्व विभागांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा व वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# प्रा. डी. बी. जांभरुणकर यांना समाजकार्य पुरस्कार जाहीर



**नांदेड (प्रतिनिधी)–** भरपणी येथील एकता सेवाभावी संस्थेच्या वतीने प्रा. डी. बी. जांभरुणकर यांना समाजकार्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

एकता सेवाभावी संस्थेच्या वतीने जागतिक दृष्टीदान दिनाच्या निमित्ताने राज्यातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना मागील २७ दरवर्षापासून राष्टीय शिक्षणरत्न, एकतारत्न, समाजरत्न व जीवनगौरव पुरस्कार दिला जातो. याचाच एक भाग म्हणून या वर्षीचा शैक्षणिक व सामाजिक कार्याचा पुरस्कार नांदेड येथील रहिवाशी प्रा. डी. बी. जांभरुणकर यांना जाहीर करण्यात आला आहे.

प्रा. जांभरुणकर हे मागील चाळीस वर्षापासून शैक्षणिक व सामाजिक कार्यात व्यस्त राहुन खेड्यापाड्यातील गोरगरीब जनतेचे प्रश्न सोडवण्याचे महत्वाचे कार्य करत आले आहेत. प्रा. जांभरूणकर यांना मिळालेल्या यापुरस्काराबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# 'एमजीएम'मध्ये बी.टेक.च्या विद्यार्थ्यांना निरोप



**नांदेड (प्रतिनिधी)–** एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा उडान हा निरोप समारंभाचा कार्यक्रम सोमवार, दि. ८ जून रोजी महाविद्यालयाच्या सर विश्वेश्वरैय्या सभागृहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. गीता लाठकर होत्या. सर्वप्रथम बी. टेक. आयटीच्या श्वेता पूर्वी आणि अझीम काझी या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

मनोगतात त्यांनी सांगीतले की; महाविद्यालयातील शिक्षकांनी त्यांना चार वर्षे महत्त्वपूर्ण ज्ञान देऊन एक जबाबदार नागरीक बनवले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर भाषणात महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. गीता लाठकर म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावेत आणि ती सत्यात उतरवावीत, पुढे एपीजे कलाम यांचे उदाहरण देत त्या म्हणाल्या की, एपीजे यांची निवड वैमानिक म्हणून झाली नाही तेव्हा ते खूप निराश झाले होते. जगण्यात काही अर्थ उरला नाही असे त्यांना वाटत होते, पण एका थोर व्यक्तीने कलाम यांना सांगीतले की, निराश होऊन ध्येय सोडू नको, देवाने तुला काहीतरी वेगळ्या कामासाठी बनवले असेल आणि पुढे ते विमान बनवणारे प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि जगातील एका मोठ्या लोकशाही राष्ट्राचे राष्ट्रपती झाले असे सांगून विद्यार्थ्यांनी सातत्य ठेवावे असेही त्या म्हणाल्या.

यावेळी उपप्राचार्य डॉ. शिरीष कोटगीरे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ.अर्चना राजूरकर विभागप्रमुख, प्रोफेसर एस. ए. हाश्मी, डॉ. कल्पना जोंधळे- पैठणे, डॉ. जसबीरसिंग सिद्धू, डॉ. अर्शद हाश्मी, टीपीओ प्रा. शिवप्रसाद तीतरे, प्रा. नारायण कदम, प्रा. राहूल शर्मा आदींची समयोचित भाषणे झाली.

यावेळी विद्यार्थ्यांना गांधीजींच्या सात तत्त्वांवर आधारित ज्ञानासोबत चारित्र्य, विवेकासोबत आनंद, नैतिकतेसह व्यापार, मानवतेसह विज्ञान, तत्त्वाचे राजकारण, तत्त्वांसोबत धर्म आणि कष्टांसह संपत्ती विचार कोरलेले स्मृतीचिन्ह भेट म्हणून देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वरी विक्रम नांदेडकर हिने केले.

यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषी महाविद्यालयातर्फे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा



**नरसीफाटा (प्रतिनिधी)–** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ अंतर्गत कृषी महाविद्यालयातर्फे लालवंडी येथे ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत विविध पर्यावरण पुरक उपक्रम राबवून पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कृषी महाविद्यालयाचे संचालक डॉ. लव्हेकर, प्राचार्य डॉ. रमेश नादरे, उपप्राचार्य डॉ. नागेश घुबे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमासाठी प्रा. शंकर नागणीकर, प्रा. डॉ. नीता देवकते यांच्या मार्गदर्शनाखाली सातव्या सत्रातील सर्व कृषीकन्यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाची सुरुवात गावातील सार्वजनिक ठिकाणी, स्वच्छता अभियान राबवून परिसर स्वच्छ केला. तसेच पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. या दरम्यान 'झाडे लावा, झाडे जगवा, प्लास्टिक मुक्त गाव, स्वच्छ गाव' यासारख्या घोषणाद्वारे नागरिकांना पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, जैवविविधता आणि सेंद्रिय शेती यांचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली. नायगाव कृषी महाविद्यालयाच्या ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# भिजलात ?

**यंदा मान्सून वेळेवर येणार आहे. पावसात भिजणं ही अनेकांच्या आवडीची गोष्ट असते. पहिल्या पावसात मनसोक्त भिजून उन्हाळ्याची काहिली दूर केली जाते. पावसाळ्यात निसर्ग बहरलेला असतो. त्यामुळे पिकनिक अथवा निसर्गदर्शनाच्या साथीने भिजणं हे ओघाने येतेच. पण नेहमीपेक्षा सध्याचा काळ जरा नाजूक आहे. गेले दोन वर्षे देशात कोरोना महामारीचे वातावरण आहे. त्यामुळे लॉकडाऊनमुळे तुम्ही कंटाळला असाल तरी पावसात भिजण्यापूर्वी काही गोष्टींकडे आवर्जून लक्ष द्या. कारण पावसात भिजताना या चुका केल्या तर तुम्ही लगेच आजारी पडू शकता...**




- डोके भिजू देऊ नका : पावसात भिजल्यावर वडिलधारी मंडळी आपल्याला लगेच डोकं म्हणजेच केस पुसण्याचा सल्ला देतात. कारण डोकं हा शरीराचा असा भाग आहे जो सर्वात वरच्या बाजूला असल्यामुळे पावसाचं पाणी थेट डोक्यावर पडतं. शरीराचे सर्व कार्य मेंदू नियंत्रित करत असतो. शिवाय मेंदू आणि डोक्याकडचा भाग हा शरीराच्या इतर भागांपेक्षा नाजूक असतो. म्हणूनच भिजताना डोक्यावर पाणी पडून तुम्हाला त्रास होण्याची शक्यता असते. यासाठीच जर पावसात जाण्याची वेळ आलीच तर छत्री अथवा एखाद्या गोष्टीने डोके झाकून ठेवा. ज्यामुळे तुम्हाला पावसाच्या पाण्याचा त्रास होणार नाही.
- पायाची निगा राखा : पावसाळ्यात पायाची निगा राखण्यासाठी बाहेरून घरी आल्यावर पाय स्वच्छ धुवावेत. कारण जर तुम्ही फ्लॅट आणि मोकळ्या डिझाईनचे फूटवेअर वापरत असाल तर पावसात पायावर मातीचे कण, चिखल, पाणी याचा सतत स्पर्श होत असतो. ज्यामुळे पायाचे इनफेक्शन होण्याची शक्यता वाढते. या काळात नायटा, खरूज, चिखल्या, रिंगवर्म असे विकार पायाला होतात. यासाठीच पाय स्वच्छ धुणे फार गरजेचं आहे.
- घरी आल्यावर लगेच कपडे बदला : पावसात भिजल्यावर घरी येताच सर्वात आधी आपण कपडे बदलले पाहिजेत. कपडे पटकन बदलण्यामुळे तुमच्या शरीराचे तापमान पुन्हा नियंत्रित होते. तुम्हाला जर थंडी वाजत असेल तर कपडे बदलण्यामुळे ती पटकन कमी होते. बऱ्याचदा पावसाच्या पाण्यातून एखाद्या आजाराचे संक्रमण अथवा फंगल संक्रमण होण्याची शक्यता असते. अंघोळ करून, हातपाय धुवून आणि कपडे बदलून तुम्ही या संक्रमणाचा धोका टाळू शकता.
- अँटि बॅक्टेरिअल क्रीम लावा : पावसात भिजून आल्यावर कपडे बदलताच त्वचेला अँटि बॅक्टेरिअल क्रीम लावा. कारण हात पाय धुतल्यावरही पावसाच्या पाण्यातील बॅक्टेरिआ तुमच्या शरीरावर असू शकतात. मात्र अँटि बॅक्टेरिअल क्रिममुळे ते त्वचेवरून नष्ट होतात. हा उपाय केल्यामुळे तुम्हाला कोणत्याही त्वचेच्या समस्या होत नाहीत. कारण पावसाच्या पाण्यामुळे नायटा, खरूज, खाज, फंगल इनफेक्शन होण्याची शक्यता अधिक असते.
- गरम चहा अथवा सूप प्या : पावसात भिजल्यावर आल्याचा चहा अथवा गरमागरम सूप प्यायल्यामुळे तुम्हाला लगेच बरं वाटू लागतं. यासाठी तुम्ही एखादा आर्युर्वेदिक काढाही नक्कीच पिऊ शकता. प्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी आल्याचा चहा, सूप, काढा पिणे फायद्याचे ठरते. सर्दी, खोकला अथवा ताप येऊ नये यासाठी पावसात भिजल्यावर हा उपाय जरूर करा.

## केवळ सूर्यप्रकाशाने व्हिटॅमिन डीची कमतरता दूर होऊ शकते?

**आपली हाडे आणि स्नायू मजबूत ठेवण्यात व्हिटॅमिन डी महत्त्वाची भूमिका बजावतात. ते शरीराद्वारे कॅल्शियमचे शोषण वाढवते, जे हाडांच्या आरोग्यासाठी आवश्यक मानले जाते.**

- व्हिटॅमिन डी आणि सूर्यप्रकाश : सूर्यप्रकाश हा व्हिटॅमिन डीचा एक नैसर्गिक स्त्रोत आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीची त्वचा अल्ट्राव्हायोलेट बी किरणांच्या संपर्कात येते, तेव्हा ती हे व्हिटॅमिन तयार करण्यास सुरुवात करते. अनेक लोक नियमितपणे सूर्यप्रकाशात जाऊन व्हिटॅमिन डीची इष्टतम पातळी राखतात. तथापि, जीवनशैलीतील बदलांमुळे व्हिटॅमिन डीची कमतरता अधिकाधिक सामान्य होत आहे. घरात जास्त वेळ घालवणे, स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवणे, सतत अंग झाकणे आणि वायू प्रदूषण यांसारख्या घटकांमुळे सूर्यप्रकाशाचा संपर्क कमी होतो. याव्यतिरिक्त त्वचेचा रंग आणि ऋतूमानातील बदल यांसारखे घटकदेखील शरीराद्वारे बनवल्या जाणाऱ्या व्हिटॅमिन डीच्या प्रमाणावर परिणाम करू शकतात. पुरेसा सूर्यप्रकाश मिळूनही, काही लोकांमध्ये व्हिटॅमिन डीची कमतरता राहू शकते आणि वैद्यकीय तपासणीनंतर त्यांना आहारात बदल किंवा पूरक औषधांची आवश्यकता भासू शकते.
- व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे कोणते आजार होऊ शकतात? : व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे हाडे कमकुवत होतात, ज्यामुळे मुलांमध्ये रिकेट्स (Rickets), प्रौढांमध्ये ऑस्टिओमॅलेशिया (osteomalacia) आणि वृद्धांमध्ये ऑस्टिओपोरोसिस (osteoporosis) होतो. दीर्घकाळ व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे हाडे मोडण्याचा धोकाही वाढतो. याशिवाय, व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होते, ज्यामुळे संसर्गाचा धोका वाढतो. यामुळे वारंवार सर्दी आणि श्वसनाच्या समस्या उद्भवू शकतात.
- व्हिटॅमिन डीच्या कमतरतेवर मात कशी करावी? : व्हिटॅमिन डीच्या कमतरतेवर मात करण्यासाठी जीवनशैलीत बदल करणे आवश्यक आहे. आठवड्यातून तीन ते चार वेळा, सकाळी किंवा संध्याकाळी १५ ते ३० मिनिटे सूर्यप्रकाशात बसल्याने व्हिटॅमिन डीची पातळी नैसर्गिकरित्या वाढण्यास मदत होते. आपल्या आहारात दूध, अंड्यातील पिवळा बलक, चरबीयुक्त मासे, मशरूम आणि दुग्धजन्य पदार्थांचा समावेश केल्याने व्हिटॅमिन डीची कमतरता टाळण्यास मदत होऊ शकते. वृद्ध, गर्भवती महिला, जास्त वजन असलेल्या व्यक्ती आणि ज्यांना पुरेसा सूर्यप्रकाश मिळत नाही अशा लोकांमध्ये व्हिटॅमिन डीची कमतरता अधिक प्रमाणात आढळते. जर तुम्हाला बऱ्याच काळापासून व्हिटॅमिन डीच्या कमतरतेची लक्षणे जाणवत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. या लक्षणांवर उपाय करण्यासाठी ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# न्यूमोनियाची लक्षणे अन् उपचार



**'न्यूमोनिया' हा आजार आपल्याला नवा राहिलेला नाही. न्यूमोनिया हा आजार संसर्गातून होतो हे आपण सगळेच जाणतो. हा आजार जरी फारसा काळजी करण्यासारखा नसला तरी देखील याकडे दुर्लक्ष करणे हे देखील चांगले नाही. वेगवेगळ्या आजारांनी ग्रासलेल्या लोकांना हा आजार होतो. त्या प्रत्येकावर त्याचे विपरित असे परिणाम जाणवू लागतात. पण आताच्या काळात न्यूमोनियाची उपचार पद्धती अगदी सहजगत्या उपलब्ध असल्यामुळे मृत्यूचे प्रमाण हे फारच कमी झालेले आहे. योग्य वेळी उपचार घेतल्याने न्यूमोनिया झालेली व्यक्ती बरी होऊ शकते.**

## न्यूमोनिया म्हणजे काय?

सगळ्यात आधी न्यूमोनिया म्हणजे काय हे जाणून घेणे गरजेचे असते. न्यूमोनिया हा फुफ्फुसांचा संसर्ग असलेला आजार आहे. आपल्या शरीरात श्वसनसंस्थेच्या बारीक बारीक नलिका असतात. ज्यांचे काम फुफ्फुसांमध्ये वायूंचे हस्तांतरण करणे असते. पण जर तुमच्या शरीरात न्यूमोनियाकोकस जीवाणू गेला असेल तर ते या कार्यात अडथळा आणण्याचे काम करतात. परिणामी फुफ्फुसांमध्ये द्रव्य साठून राहतो. या द्रव्यामुळे फुफ्फुसांचे कार्य मंदावते. त्यामध्ये कफसारखा द्रव्य साचून राहतो. हा त्रास दोन्ही फुफ्फुसांना होऊ शकतो. न्यूमोनिया हे त्या आजाराचे नाव नाही तर हे आजाराचे लक्षण आहे. फुफ्फुसांच्या वायूनलिकेत द्रव्य साचून राहिल्यामुळे या आजारातही श्वसनास अडथळा निर्माण होतो. अपुऱ्या ऑक्सिजनमुळे पेशींचे कार्य नीट होत नाही. यामध्ये योग्यवेळी उपचार केले नाही तर रुग्णावर मृत्यूची वेळ ओढावते. डबल न्यूमोनिया हे देखील तुम्ही नक्कीच ऐकले असेल. दोन्ही फुफ्फुसांना झालेल्या संसर्गाला असे म्हटले जाते. न्यूमोनिया झाला की नाही हे तपासण्यासाठी वेगळी चाचणी करावी लागते. न्यूमोनियाचे प्रकारही आहेत. त्यानुसार त्यांची लक्षण बदलतात. पण या आजारामध्ये काही ठराविक लक्षणं सर्वसाधारणपणे एखाद्या फ्लू सारखी असतात. आता विस्तृतपणे न्यूमोनियाची लक्षणे कोणती ते जाणून घेऊया...

## काही प्रश्न...

- न्यूमोनियाची सर्वसाधारण कारणे कोणती? : न्यूमोनिया हा संसर्गजन्य आजार आहे. शरीरात मोठ्या प्रमाणात सर्दी झाली की हा त्रास होण्याची शक्यता असते. शिवाय एखाद्या आजारी व्यक्तीच्या संपर्कात आल्यानंतरही हा त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे वेगवेगळ्या कारणांमुळे न्यूमोनिया होण्याची शक्यता असते.
- न्यूमोनिया झाल्यावर काय खावे? : न्यूमोनिया झाल्यानंतर चांगला आहार घेणे गरजेचे असते. जर तुम्ही चौकस आहार घेतला तर तुमच्या शरीराची प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत मिळते. त्यामुळे आहारात भाज्या, फळ यांचा जास्तीत जास्त समावेश करावा.
- तापाशिवाय न्यूमोनिया होऊ शकतो का? : हो पण हे दुर्मिळ लक्षण आहे. तापाशिवाय न्यूमोनिया येणारा प्रकार हा फारच कमी पाहायला मिळाला आहे. त्यामुळे हे लक्षण सगळीकडेच दिसून येईल असे नाही.
- न्यूमोनिया आपोआप बरा होतो का? : हो, न्यूमोनिया हा आपोआप बरा होऊ शकतो. पण तरीदेखील तुम्ही त्याची काळजी घेणे गरजेचे असते. डॉक्टरांचा योग्य सल्ला घेणे हे देखील गरजेचे असते. जर तुम्हाला ताप आला असेल तर तुम्ही अँटीबायोटिक्स घ्या. तुम्हाला नक्कीच बरे वाटेल.

## न्यूमोनियावर घरगुती उपचार

न्यूमोनिया झाल्यानंतर पटकन घाबरून जाऊ नका. डॉक्टरांचा योग्य सल्ला वेळीच घ्या. अंगावर एखादा त्रास काढण्याऐवजी पटकन उपचार सुरू केले तर त्याचा अधिक फायदा होतो. तुम्हाला त्यातून बाहेर पडण्यासही मदत मिळते. औषधांचे उपचार झाल्यानंतरही तुम्ही काही घरगुती उपचार सुरू ठेवले तर तुम्ही त्यातून पूर्णपणे बरे होऊ शकता. न्यूमोनिया असलेल्यांना डोकेदुखीचा त्रास आणि सतत शिंका येत राहतात. अशावेळी आलं आणि हळद घालून तयार केलेला चहा घेतल्यास डोकेदुखी कमी होण्यास मदत मिळते. पुदिन्याची पाने ही देखील तुमचा कफ कमी करण्यास मदत करू शकतात. पुदिन्याची पानं ही अँटी- एन्फ्लिमेंटरी असतात. ज्यामुळे दाह कमी होण्यास मदत मिळतो. कफ कमी झाल्यामुळे श्वनसास अडथळा येत नाही. छातीमध्ये असलेला संसर्ग कमी करण्यासाठी कॉफी देखील फारच फायद्याची आहे. जर तुम्ही गरम गरम कॉफी प्यायली तरी देखील फुफ्फुसांचा त्रास कमी होतो. मधामध्ये देखील अँटी फंगल गुणधर्म असतात. मधाचे चाटण केले तरी देखील शरीरातील थंडी कमी होते. पाव कप पाण्यात जर तुम्ही 1 चमचा मध घालून असे गरम पाणी प्यावे. त्यामुळे देखील आराम मिळू शकतो. न्यूमोनिया झालेल्या रुग्णांमध्ये खाण्याची इच्छा कमी झालेली असते. अशावेळी तुम्ही वेगवेगळ्या भाज्यांचे सूप करून प्यायले तर त्याचा फायदा तुम्हाला नक्कीच होऊ शकतो. ज्यावेळी तुम्हाला काहीही खाण्याची इच्छा नसेल तर अशावेळी गरम गरम सूप प्यावे. तुम्हाला त्याचा फायदा नक्कीच होईल.

## होऊ नये म्हणून काय करावे...

**न्यूमोनिया हा गंभीर आजार नसला तरी या आजारापासून सध्याच्या घडीला दोन ते चार हात दूर राहणेच चांगले. न्यूमोनिया होऊ नये म्हणून तुम्ही नेमकी काय काळजी घ्यायला हवी ते जाणून घेऊया.**



- शरीर सतत ओले ठेवू नका. त्यामुळे तुम्हाला ताप येण्याची शक्यता असते. त्यामुळे खूप वेळ पाण्यात राहात असाल तर संपूर्ण कपडे बदला. सर्दी होऊ देऊ नका. शरीरातील कफ वाढला की, हा त्रास बळावतो.
- प्रतिकार शक्ती कमी होऊ देऊ नका. कारण आता कोरोनामुळे कमी झालेल्या प्रतिकार शक्तीमुळेदेखील न्यूमोनिया होऊ शकतो. जर तुम्हाला दमा असेल तर अशांनी विशेष काळजी घ्यावी त्यामुळे तुम्हाला त्रास होणार नाही. हा संसर्गातून होणारा आजार असल्यामुळे स्वच्छता पाळा.
- काही जीवनसत्व आपल्याला नैसर्गिकपणे मिळत नाही. यापैकीच एक आहे व्हिटॅमिन D जे सूर्याच्या अतिनील किरणांमुळे तुम्हाला मिळत असते. शरीरात त्याची उत्पत्ती आपोआप होत नाही. त्यामुळे तुम्ही योग्य आणि पूरक आहाराचे सेवन करा.

## न्यूमोनियाची लक्षणे कोणती?

**न्यूमोनिया हा आजार एखाद्या फ्लू प्रमाणे आहे. या आजारांची लक्षणे ही काही अंशी एखाद्या फ्लू सारखी जरी असली तरी देखील याकडे दुर्लक्ष केल्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. जाणून घेऊया न्यूमोनिया लक्षणे.**

- ताप : ताप हे कोणत्याही फ्लूचे प्राथमिक लक्षण असते. अगदी त्याचप्रमाणे न्यूमोनिया झाला असेल तरी ताप येऊ लागतो. हा ताप अचानक वाढतो आणि कमी होतो. साधारण 24 ते 48 तासांहून अधिक काळ हा ताप शरीरात राहिला की काही आणखी त्रासही शरीराला होऊ लागतात. सुरुवातीला हा ताप अगदी सर्वसाधारण वाटू लागतो. पण नंतर मात्र हा अधिक वाढू लागतो. कारण तापाने अंग फणफणलेले असताना काही अन्य परिणामही होऊ लागतात. जे शरीरासाठी हानिकारक ठरू लागतात.
- अस्वस्थपणा : आजारी वाटू लागल्यावर एका जागी बसणे हे शक्य नसते. सतत आपल्याला पडून राहावेसे वाटू लागते. शरीरात आलेला ताप हा ज्यावेळी तुम्हाला अस्वस्थ करू लागतो त्यावेळी तुम्ही त्याकडे दुर्लक्ष मुळीच करू नका. तुम्ही लगेचच डॉक्टरांना गाठा. कारण तापामुळे देखील यामध्ये अस्वस्थपणा जाणवू शकतो.
- खोकला : फुफ्फुसांशी निगडीत असा हा त्रास असल्यामुळे खोकल्याचा त्रास देखील न्यूमोनियामध्ये होतो. खोकल्यामुळे शरीरात जास्तीत जास्त कमजोरी येऊ लागते. जर तुम्हाला ताप- खोकला अशीही काही लक्षण असतील तर ती न्यूमोनियाची आहेत हे समजावे. त्याच योग्य तपासणी करुन घ्यावी. या आजारांमध्ये खोकल्यातून लाल, हिरवा, पिवळा असा कफ पडतो.
- श्वसनास अडथळा : कोरोना या आजाराच्या लक्षणामध्ये श्वसनास अडथळा निर्माण होणे हे एक लक्षण आहे. अगदी त्याचप्रमाणे न्यूमोनियामध्ये देखील श्वसनास अडथळा निर्माण होते. हा संसर्ग फुफ्फुसांना झाल्यामुळे श्वसननलिकेला अडथळा निर्माण होतो. परिणामी न्यूमोनिया झालेल्या व्यक्तीला मोठ्याने श्वास घ्यावा लागतो. शरीरातील रोग प्रतिकारकशक्ती कमी झाली तरी देखील न्यूमोनियाचा त्रास संभवू शकतो. जर तुम्हाला वरील काही लक्षणे जाणवत असतील तर तुम्ही नक्कीच न्यूमोनियाची चाचणी देखील करुन घेणे गरजेचे असते.
- छातीत दुखणे : सतत खोकल्यामुळे आणि शरीरामध्ये ताकद न राहिल्यामुळे शिवाय श्वसनासाठी जास्तीची एनर्जी वापरल्यामुळे छातीत दुखण्याचा त्रास हा हमखास या न्यूमोनियामध्ये होतो. यावेळी छातीतच नाही तर पोटात देखील दुखू लागते.
- थकवा : न्यूमोनियाचे आणखी एक लक्षण म्हणजे थकवा. जर तुम्हाला तापामध्ये प्रमाणापेक्षा जास्त थकवा येत असेल तर ते न्यूमोनियाचे एक लक्षण आहे. जर तुम्ही सतत थकत असाल. तुमच्या शरीरात अजिबात त्राण नसेल तर तुम्हाला न्यूमोनिया झालेला असू शकतो. त्यामुळे सतत आलेल्या थकव्याकडे दुर्लक्ष करू नका.
- डोकेदुखी : सतत खोकल्याचा परिणाम हा डोकेदुखीतून दिसू लागतो. जर तुम्हाला मोठ्याप्रमाणात डोकेदुखी होत असेल तर हे देखील न्यूमोनियाच्या एका लक्षणांपैकी आहे. अशी डोकेदुखी तुम्हाला होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका.
- आजारी असल्यासारखे वाटणे : न्यूमोनियामध्ये शरीराची सगळी ताकद निघून जाते. तुम्हाला इतका प्रचंड थकवा येतो की, त्यामुळे सतत चक्कर येणे किंवा डोळ्यासमोर अंधारी आल्यासारखे वाटते. हा त्रास तुमच्या शरातील थकवा वाढल्यामुळे आणि आहार न घेतल्यामुळे होऊ शकतो.
- भूक न लागणे : बरेचदा आजारात भूक लागत नाही. न्यूमोनिया या आजारामध्ये सुद्धा भूक लागत नाही. बरेचदा अशावेळी काहीही खाण्याची इच्छा होत नाही. मंदावलेली भूक ही प्रतिकार शक्तीवर मोठ्याप्रणात परिणाम करते. भूक न लागल्यामुळे आणि योग्य आहार न घेतल्यामुळे अचानक वजन कमी होते. शरीर जर्जर झाल्यामुळे खाण्याची इच्छा मरुन जाते. जर तुम्हाला अशी काही लक्षण जाणवत असतील तर तुम्हाला न्यूमोनिया असण्याची शक्यता नाकारता येणार नाही.
- हृदय जोरात धडधडणे : एखाद्या गोष्टीला घाबरल्यानंतर किंवा काहीतरी झाल्यानंतर जरी धडधड होऊ लागते. अगदी तशीच धडधड ही न्यूमोनिया झालेल्या व्यक्तीला होऊ लागते. छातीत सतत धडधड होणे हे न्यूमोनियाच्या गंभीर लक्षणांपैकी एक आहे.

## घनदाट केसांसाठी कोरफडचे फायदे

कोरफडमध्ये आढळणारे पोषक तत्व हे केसांमध्ये मुलायमपणा राखण्यास मदत करते. तसेच केसांना लागणारे आवश्यक पोषण प्रदान करण्याचे कामही करते. त्यामुळे केस लवकर वाढतात. तसंच कोरफड जेल हे स्काल्पमधील रक्तप्रवाह वाढवून केसांना मजबूती देण्याचे काम करते. अशाप्रकारे कोरफड केसांचा विकास करण्यासाठी अधिक फायदेशीर ठरते. कोरफड जेल हे कोंडा आणि स्काल्पमधील येणारी खाज दूर करण्यासाठीही उपयोगी ठरते. तसंच अँटीडँड्रफ गुण यामध्ये असल्याने याच्या वापराने कोंड्याची समस्या पटकन सुटते. याच गुणामुळे याचा वापर शँपू अथवा कंडिशनरमध्ये मुख्य घटक म्हणून करण्यात येतो. इतकंच नाही कोरफड जेल तुम्ही शँपूमध्ये मिक्स करून लावल्याने केसांना पोषक तत्व मिळतात. कोरफड जेलमध्ये मुख्य स्वरूपात विटामिन बी1, बी2, बी6 आणि बी12 असतात जे केसांचा विकास अधिक करण्यास मदत करतात.



# २०१७ आणि २०१९ मधील पात्र शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ

**मुंबई(प्रतिनिधी)–** २०१७ आणि २०१९ मधील कर्जमाफी योजनांमध्ये तांत्रिक अडचणी किंवा इतर कारणांमुळे पात्र असूनही लाभापासून वंचित राहिलेल्या ५ लाखाहून अधिक शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडलेल्या या बैठकीत या प्रस्तावावर शिक्कामोर्तब करण्यात आले असून, यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर सुमारे १४ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडणार आहे.२०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफी योजनेत अनेक शेतकरी पात्र ठरले होते, मात्र बँकांच्या तांत्रिक त्रुटी आणि विविध नियमांच्या कचाट्यात अडकल्याने त्यांना प्रत्यक्षात लाभ मिळाला नव्हता. या वंचित शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी राज्यभरातून वारंवार मागणी होत होती. या पार्श्वभूमीवर सरकारने ५ लाख शेतकऱ्यांच्या थकीत कर्जाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी हे मोठे विशेष आर्थिक पॅकेज मंजूर केले आहे.



या योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. राष्ट्रीयकृत, खासगी आणि ग्रामीण बँकांकडे असलेल्या शेतकऱ्यांच्या पीक कर्ज किंवा पुनर्गठित अनुत्पादित (एनपीए) कर्जांना कर्जमुक्तीचा लाभ दिला जाईल. बँकांच्या कर्ज खात्यातील शिल्लक रक्कमेवर तडजोड करून निश्चित टक्केवारीनुसार सूट मिळवण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती बँकांशी वाटाघाटी करेल. या समितीत प्रधान सचिव (सहकार), महा-आयटीचे व्यवस्थापकीय संचालक आणि सहकार आयुक्तांचा समावेश असेल.

मंत्रालयीन विभागांच्या पुनर्रचनेस मान्यता. तेरा विभागांची पूनर्रचना. यामुळे एकाच विभागात असलेल्या दोन उपविभागांचे स्वतंत्र विभाग होणार. आता ३३ प्रशासकीय विभाग होते, त्यांची संख्या १० ने वाढून ४३ होणार. पण नवीन पद निर्मिती होणार नाही, पण विभागांना आता सुलभपणे काम करता येईल, अशा पद्धतीने कामकाजांची विभागणी होणार. निर्णय प्रक्रिया गतीमान होणार. राज्यातील नवीन महाविद्यालयांना अंतिम मान्यता, विस्तारीकरणात नवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम व नवीन विषय, तुकडी यांना मान्यता देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता.केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मधील तरतूदींना सुसंगत आणि सूसत्रतेसाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा तसेच त्याअन्वये महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक २०२६ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता.महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडसाठी कर्ज उभारणीकरता अधिकारात वाढ करणार. अध्यादेश काढण्यास तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी.

# अल्पवयीन मुलीची प्रसूती प्रकरणी डॉक्टरसह ९ जणांना बेड्या

**नाशिक(प्रतिनिधी)** –नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे एक खळबळजनक घटना समोर आली आहे. अनैतिक संबंधातून गर्भवती राहिलेल्या १६ वर्षीय मुलीची बेकायदेशीर प्रसुती करून तिच्या बाळाला विक्री करण्याच्या उद्देशाने ठेवून घेतल्याने चौघा डॉक्टरांसह ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करत ९ जणांना अटक करण्यात आली आहे.

मालेगाव शहरातील हिराई रूग्णालयात ३ जून रोजी संजय भागवत गवळी, नंदिनी गवळी, प्रवीण देशमुख यांनी अनैतिक संबंधातून गर्भवती राहिलेल्या अल्पवयीन मुलीला प्रसूतीसाठी दाखल केले होते. ही म ुलगी अल्पवयीन होती हे माहीत असून देखील डॉ. डांगे व डॉ. किशोरी डांगे यांच्या सांगण्यावरून तिला रूग्णालयात दाखल करण्यात आले, एवढेच नाही तर नियुक्तीस असलेल्या डॉ. अनुजा शेवाळे, डॉ. प्रीती जाधव, कर्मचारी नवसिन रफिक शेख, सार्थक प्रवीण जगताप, मोहंमद फईम मोहंमद यांनी तिची सिझरियनद्वारे प्रसूती केली.

धक्कादायक म्हणजे प्रसूतीनंतर जन्मलेल्या बाळाची विक्री करण्याच्या हेतूने त्याची ओळख लपविण्याचा आरोपही फिर्यादीत करण्यात आला आहे. मालेगाव येथील सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय आरोग्याधिकारी डॉ. जितेंद्र डोलारे यांना काही सामाजिक कार्यकर्त्यांनी ही माहिती दिली. यावेळेस त्यांनी पोलिसात फिर्याद दिली.

पोलिसांनी सदर मुलीला गर्भवती करणाऱ्या अनोळखी तरुणासह संजय गवळी, प्रवीण देशमुख, नंदिनी गवळी, हिरा रूग्णालयाचे संचालक डॉ. किशोर डांगे, डॉ. किशोरी डांगे व रूग्णालयातील वैद्यकीय कर्मचारी डॉ. अनुजा शेवाळे, डॉ. प्रिती जाधव, रूग्णालय कर्मचारी नवसिन शेख, मोहंमद फईम सार्थक जगताप यांच्याविरूध पोक्सो व अन्य कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. यातील दोघे फरार असून अटक करण्यात आलेल्यांना १२ जूनपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री माजीदखान निसारखान, श्री साजीदखान निसारखान व श्रीमती शमिमुनिसा बेगम सद्रोदीन सर्व रा. किनवट, जि. नांदेड यांनी मौ. किनवट ता. किनवट जि. नांदेड गट न. २१२ क्षेत्रफळ ०२ हे. ०० आर गट नं. २१२/१ क्षेत्रफळ ०४ हे. १९ आर. गट नं. २११/१ क्षेत्र. ०५ हे. २१ आर व गट नं. १२० नवीन गट क्र. २१२ क्षेत्रफळ ०४ हे. १९ आर. (पोटखराब सह) पैकी ०२ हे. १९ आर जमीन हैद्राबाद इनाम निर्मूलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषिक प्रयोजनासाठी भोगवटादार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रूपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेव्हा मौ. किनवट ता. किनवट जि. नांदेड गट नं. २१२ क्षेत्र. ०२ हे. ०० आर गट नं. २९२/१ क्षेत्र. ४ हे. १९ आर, गट नं. २११/१ क्षेत्र ५ हे. २१ आर व गट नं. १२० नवीन गट नं. २१२ क्षेत्र ४ हे. १९ आर (पोटखराब सह) पैकी २ हे. १९ आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मूलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषिक प्रयोजनासाठी भोगवटादार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रूपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप सादर करावा. विहित मुदतीत कोणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रक्रियेस कुणाचाही आक्षेप नाही असे समजण्यात येऊन सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. तसेच सदर प्रकरणात विहित मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी(सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड**


# सोने-चांदीचे दर सलग तिसऱ्या दिवशी गडगडले

**मुंबई(प्रतिनिधी)–**भारतीय सराफा बाजारात ९ जून २०२६ रोजी सोने आणि चांदीच्या किमतींमध्ये सलग तिसऱ्या दिवशी घसरण नोंदवली गेली आहे.

जागतिक बाजारातील घडामोडी आणि गुंतवणूकदारांच्या बदलत्या भूमिकेमुळे सोने सुमारे १,००० रुपये प्रति १० ग्रॅमने स्वस्त झाले असून चांदीच्या दरातही ५०० ते १,००० रुपये प्रति किलोपर्यंत घट झाली आहे.

'ब्लॅक मंडे'नंतर जागतिक बाजारात मोठी उलथापालथ झाल्यानंतर मल्टी कमोडिटी एक्स्चेंज आणि देशांतर्गत किरकोळ बाजारात सोने आणि चांदीच्या दरांवर दबाव कायम आहे. त्यामुळे सोने आणि चांदीच्या किमतींम ध्ये सातत्याने घसरण होत असल्याचे दिसून येत आहे.

सोन्याप्रमाणेच चांदीच्या किमतीतही आज घसरण झाली आहे. सध्या चांदीचा दर प्रतिकिलो रु.२,५९,९०० ते रु.२,६०,००० दरम्यान आहे. किरकोळ बाजारात १० ग्रॅम चांदीचा दर रु.२६० ते रु.२७० दरम्यान व्यवहारात आहे.

अमेरिकेच्या मध्यस्थीनंतर इराण आणि इस्रायल यांनी सध्या हवाई हल्ले थांबविल्याची माहिती समोर आली आहे. युद्धाचा धोका कमी झाल्याने गुंतवणूकदारांनी सुरक्षित गुंतवणूक मानल्या जाणाऱ्या सोने आणि चांदीमधून पैसे काढण्यास सुरुवात केली आहे. याचा परिणाम दरांवर झाला आहे.

अमेरिकेच्या १० वर्षांच्या ट्रेझरी बाँडचे उत्पन्न गेल्या दोन आठवड्यांतील उच्चांकावर पोहोचले आहे. बाँडवरील परतावा वाढल्यामुळे व्याज न देणाऱ्या सोन्याकडे गुंतवणूकदारांचा कल कमी होत आहे. जागतिक स्तरावर अमेरिकन डॉलर मजबूत झाल्यानेही सोने आणि चांदीच्या किमतींवर दबाव आला आहे. यामुळे कमोडिटी बाजारात स्पॉट गोल्डचे दर घसरले असून ते दोन महिन्यांच्या नीचांकी पातळीच्या जवळ पोहोचल्याचे सांगितले जात आहे. सोन्या-चांदीच्या किमतीतील या घसरणीमुळे ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला असला, तरी पुढील काही दिवस जागतिक आर्थिक आणि भू-राजकीय परिस्थितीनुसार दरांम ध्ये आणखी चढ-उतार होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.


## जाहीर प्रगटन

अल मदिना बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गुलशन कॉलनी माळटेकटी स्टेशन रोड ता. जि. नांदेड संचालित सफा मरवा उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळा भायेगाव, ता. जि. नांदेड ही शाळा मौल्ला मायनॉरिटी एज्युकेशन सोशल अॅन्ड कल्चरल वेल्फेअर सोसायटी नांदेड ता. जि. नांदेड या संस्थेस कायमस्वरूपी हस्तांरण करण्यास आजपासून सुरुवात होत आहे. तरी कोणाची हरकत/आक्षेप असेल तर १५ दिवसांच्या आत मा. शिक्षणाधिकारी उपसंचालक कार्यालय लातूर यांच्याकडे कळविण्यात यावे.

| अध्यक्ष | मुख्याध्यापक |
|---|---|
| अल मदिना बहुउद्देशीय सेवाभावी संस्था नांदेड | सफा मरवा उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळा भायेगाव ता. जि. नांदेड |

## टी. सी. हरवली आहे

माझी वैशाली विश्वजित सोमठाणकर या नावाची इयत्ता १२ वी विज्ञान पासची टी. सी. पावडेवाडी नाका ते मध्यवर्ती बसस्थानक दरम्यान ऑटो प्रवासात गहाळ झाली आहे. कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता–** वैशाली विश्वजित सोमठाणकर रा. राजनगर, नांदेड
मो. ८९७५७६६७८०

## प्रमाणपत्र हरवले

माझे प्रथमेश सचिन गच्चे या नावाचे जात प्रमाणपत्र वाडी पाटी ते नांदेड दरम्यान ऑटो प्रवासात हरवले आहे. ज्यांना कोणाला सापडल्यास त्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता–**प्रथमेश सचिन गच्चे, रा. पिंपळगाव निमजी, ता. जि. नांदेड
मो. ८६०५२५८५४६

## जाहीर प्रगटन

तलाठी सज्जा, हसनाळ, ता. मुखेड
विषयः मौ. भेंडेगाव (बु) ता. मुखेड येथील सहधारकाचे सानुग्रह अनुदान वितरण करणेबाबत.
नोटीस क्र. २१ गट क्र. ५८ क्षेत्र ७.६३ है. आर.
संदर्भ-उमेश सदाशिवराव पाटील यांचे अर्ज दिनांक ०२/०२/२०२६.

लेंडी प्रकल्पांतर्गत बुडीत गावातील मौ. भेंडेगाव (बु) शेतकरी सानुग्रह अनुदान वितरित करणेसाठी उपरोक्त संबंधीत लाभधारकांना नोटिस क्र. २१ देण्यात आल्या आहेत. सदर सानुग्रह अनुदानाचे अनुषंगाने जमा कागदपत्राच्या अनुषंगाने अभिलेख तपासणी केले असता गट क्र ५८ या गटाच्या एकूण क्षेत्र ७. हे ६३ आर ७/१२ वर विठ्ठल सदाशिव, उमेश सदाशिव व अनुसयाबाई सदाशिव यांच्या नावांची नोंद दिसून येत असुन सदर अनुदान मागणी करणारे अर्जदार उमेश सदाशिव व अनुसयाबाई सदाशिव यांनी सदर व्यक्ती विठ्ठल सदाशिव हे मयत असून त्यांचे इतर कोणतेही वारस नाहीत तसेच त्यांचे नाव इतर कागदपत्रावर मंगेश असून नजरचुकीने ७/१२ वरती विठ्ठल सदाशिव अशी नोंद झालेली आहे असे अर्ज करुन नमूद केले आहे.

त्यानुषंगाने सदर नोटिसमधील भूधारकाचे त्यांच्या गट क्र. ५८ क्षेत्र ७.६३ हे. आर. या गटाच्या ७/१२ वर विठ्ठल सदाशिव यांच्या नावांची नोंद आहे. तरी सदर गटामधील विठ्ठल सदाशिव व मंगेश सदाशिव यांचे नावाचे हितसंबंधित व्यक्तीनी किंवा त्यांच्या इतर नातेवाईकांनी सदरील नोंद व मयत व्यक्तीसंबंधी काही आक्षेप किंवा हरकती असल्यास १५ दिवसांच्या आत आपले लेखी म्हणणे विधीज्ञामार्फत किंवा स्वता उपस्थित राहून या कार्यालयास सादर करण्यासाठी सदर जाहीर प्रगटन आपल्या सज्जातील गावात डकवुन त्यांचा पंचनामा या कार्यालयास सादर करावे

**(अनुप पाटील)**
**उपविभागीय अधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी देगलूर**

## बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ संलग्नीत**
**श्री साईबाबा संस्थान नांदेडचे साईबाबा कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय**
**साईनगर धनगरवाडी ता. जि. नांदेड**

**येथे पदवीसाठी प्रवेश देणे चालू आह**

**बी. ए. प्रथम आणि द्वितीय वर्ष**
**बी. कॉम. प्रथम आणि द्वितीय वर्ष**
**बी. एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) प्रथम आणि द्वितीय वर्ष**
**साईबाबा महाविद्यालय साईनगर, धनगरवाडी पाटी ता. जि. नांदेड**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड जवळ हायवे रोडवर श्री साईबाबा मंदिराजवळ साईनगर, धनगरवाडी पाटी, ता. जि. नांदेड

संपर्क– मो. नं. ७५८८६३२५२०, ९२२६७२९१४७
९०९६००९२०५, ९५२७७५७२३६

प्रभारी प्राचार्य
साईबाबा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
साईनगर धनगरवाडी पाटी ता. जि. नांदेड

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## पाहिजेत

**श्री.साईबाबा संस्थान साईनगर धनगरवाडी ता. जि. नांदेड संचलित, साईबाबा ( कला वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय धनगरवाडी ता. जि.नांदेड** (कायम विनाअनूदानित) महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याच्या जागा इच्छुक उमेदवारानी दि 14/06/2026 रोजी रविवारी **सकाळी** 11:00 वाजता मुळ व छायांकीत प्रतिसह, **साईबाबा महाविद्यालय साईनगर धनगरवाडी ता.जि. नांदेड** (saibabamvsd2025@gmail.com)येथे थेट मुलाखतीस उपस्थीत रहावे.

| विषय | शैक्षणिक व व्यवसायीक पात्रता | संवर्ग |
|---|---|---|
| प्राचार्य | एम.ए./एम.एसी./ एम कॉम नेट/सेट/पी एच.डी.(15 वर्ष अध्यापनाचा अनूभव) | अराखीव. |
| अर्थशास्त्र,राज्यशास्त्र, समाजशास्त्र,इतिहास,भुगोल. | एम.ए./, नेट/सेट/ पी एच.डी. पदसंख्या प्रत्यकी (01) | U.G.C च्या नियमा प्रमाने लागू होईल. खुला. अनु जाती., अनु जमाती. वि.जा.अ. इ.मा.व., सा.शै.मा.प्र., विकलांग रिक्त पदा प्रमाने निवड करण्यात यईल. |
| मराठी, इंग्रजी, हिंदी. | एम.ए. नेट/सेट/पीएच.डी. पदसंख्या प्रत्यकी (01) | |
| संगनकशास्त्र, सूक्ष्मजीवनशास्त्र ,प्राणीशास्त्र,वनस्पतिशास्त्र, गणित. | एम.एसी.एम.सी.ए.नेट/सेट/ पी एच.डी. पदसंख्या प्रत्यकी (01) | |
| वाणीज्य. | एम.कॉम. नेट/सेट/पीएच.डी. पदसंख्या प्रत्यकी (01) | |
| प्रयोगशाळा सहाय्यक, लिपीक , शिपाई. | B-LIB / 12 वी (विज्ञान) 10 वी | पदसंख्या प्रत्यकी (01) |

| | |
|---|---|
| **टिप**:1. विद्यापीठ अनूदान आयोग व महाराष्ट्र शासन यांनी ठरवून दिलेली शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील.2.मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांनी स्वखर्चाने कोणतेही भाडे अथवा प्रवास भत्ता दिल्या जाणार नाही. **संपर्क मो.** 7588632550/ 9226729147 | **सचिव** **श्री.साईबाबा संस्थान साईनगर धनगरवाडी ता. जि. नांदेड.** |

ग्राम विकास शिक्षण संस्था चिखली संचालित,
शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर कला व विज्ञान महाविद्यालय बारुळ
ता. कंधार जि.नांदेड

## पाहिजेत

**ग्राम विकास शिक्षण संस्था चिखली ता. कंधार जि. नांदेड संचलित शांतीदूत गोविंदराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय बारूळ ता. कंधार जि.नांदेड** (कायम विनाअनूदानित) मा. सहसंचालक उच्च शिक्षण नांदेड यांचे पत्र क्र 811 विशिससं/ उशि/ नांवि/ अनू-2/2024-25 दि 19/05/2025 रोजीच्या ना हरकत प्रमाणपत्रानूसार पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या जागा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या नियमाप्रमाणे भरावयाच्या आहेत. इच्छुक उमेदवारानी दि 14/06/2026 रोजी रविवारी ठीक 11 वाजता **साईबाबा महाविद्यालय साईनगर धनगरवाडी ता.जि. नांदेड** येथे अर्ज व आवश्यक त्या कागदपत्राच्या मुळ व छायांकीत प्रतिसह थेट मुलाखतीस उपस्थीत रहावे.

| अ.क्र. | पद | विषय | पदसंख्या | शैक्षणिक व व्यवसायीक पात्रता | संवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1. | प्राचार्य | | 01 | एम.ए./एम.एसी, नेट/सेट/पीएच.डी. (15 वर्ष अध्यापनाचा अनूभव) | अराखीव |
| 2. | सहा.प्राध्यापक | भुगोल | 01 | एम.ए./एम.एसी, नेट/सेट/पीएच.डी. | खुला-02 अनू.जाती-01,वि.जा.(अ)-01, इ.मा.व.-01,सा.शै.मा.प्र-01 |
| 3. | सहा.प्राध्यापक | शा.शि.संचालक | 01 | एम.पी.एड. नेट/सेट/पीएच.डी | |
| 4. | सहा.प्राध्यापक | रसायनशास्त्र | 01 | एम.ए./एम.एसी, नेट/सेट/पीएच.डी. | |
| 5. | सहा.प्राध्यापक | भौतिकशास्त्र | 01 | एम.ए./एम.एसी नेट/सेट/पीएच.डी. | |
| 6. | सहा.प्राध्यापक | संगणकशास्त्र | 01 | एम.एसी,एम.सी.ए.नेट/सेट/पीएच.डी. | |
| 7. | सहा.प्राध्यापक | ग्रंथपाल | 01 | एम.लिब,नेट/सेट/पीएच.डी. | अराखीव |
| 8. | मुख्य लिपीक | - | 01 | पदवीधर - टाईप, संगणक | अराखीव |
| 9. | वरिष्ठ लिपीक | - | 01 | पदवीधर - टाईप, संगणक | अराखीव |
| 10. | कनिष्ठ लिपीक | - | 01 | पदवीधर - टाईप, संगणक | अराखीव |
| 11. | प्रयोगशाळा सहाय्यक | - | 01 | 12 वी (विज्ञान) उत्तीर्ण | अराखीव |
| 12. | ग्रंथालय परिचर | - | 01 | 10 वी उत्तीर्ण | खुला-03 अनु.जाती-01,अनु.जमाती-01,वि.जा.अ.-01,इ.मा.व.-01,सा.शै.मा.प्र-01,आ.दु.घ.01 |
| 13. | प्रयोगशाळा परिचर | - | 04 | 10 वी उत्तीर्ण | |
| 14. | शिपाई | - | 04 | 10 वी उत्तीर्ण | |

| | |
|---|---|
| **टिप**:1. विद्यापीठ अनूदान आयोग व महाराष्ट्र शासन यांनी ठरवून दिलेली शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील.2.मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांनी स्वखर्चाने कोणतेही भाडे अथवा प्रवास भत्ता दिल्या जाणार नाही. **संपर्क मो.** 9552722721 | **सचिव, ग्राम विकास शिक्षण संस्था चिखली ता. कंधार जि.नांदेड** |

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस
महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# ८०० शाळांतील १,५०० विद्यार्थी करणार जनजागृती -मेघना कावली

## जिल्हा परिषदेचा विद्यार्थी आरोग्यदूत उपक्रम

**नांदेड (प्रतिनिधी) –नांदेड–** ग्रामीण भागात आरोग्य, स्वच्छता, कृषी व पशुसंवर्धनविषयक जनजागृती अधिक प्रभावीपणे करण्यासाठी नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने विद्यार्थी आरोग्यदूत हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रम ंतर्गत जिल्ह्यातील ८०० शाळांमधील १ हजार ५०० विद्यार्थ्यांची आरोग्यदूत म्हणून निवड करण्यात आली असून, त्यामध्ये तब्बल ९०० मुलींचा सहभाग आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दिली.

माझं गाव आरोग्य संपन्न गाव या मोहिमेअंतर्गत हा उपक्रम वर्षभर राबविण्यात येणार आहे. आरोग्य व विज्ञान विषयाची आवड असलेल्या इयत्ता सातवी व आठवीतील विद्यार्थ्यांची शाळास्तरावरील चाचणीद्वारे निवड करण्यात आली आहे. प्रत्येक शाळेतून किमान एक, तर मोठ्या शाळांमधून दोन विद्यार्थ्यांची आरोग्यदूत म्हणून निवड करण्यात आली आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विशेष टी-शर्ट, ओळख बॅच तसेच विद्यार्थी आरोग्यदूत मार्गदर्शन पुस्तिका देण्यात येणार आहे. दर दोन महिन्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्तरावर दोन दिवसांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार असून यापूर्वी समुदाय आरोग्य अधिकारी आणि शिक्षकांना प्रशिक्षक म्हणून प्रशिक्षण देण्यात आले आहे. हे प्रशिक्षक विद्यार्थ्यांना नियमित म ार्गदर्शन करणार आहेत.

आरोग्यदूत विद्यार्थी शाळा, कुटुंब आणि ग्रामपातळीवर आरोग्यविषयक जनजागृतीचे कार्य करतील. आजारांपासून बचावासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाय, प्राथमिक उपचार पेटीचा वापर, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता, घर व परिसर स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व याबाबत ते मार्गदर्शन करतील. याशिवाय कृषी विभागामार्फत रानभाज्यांचे पोषणमूल्य, शेतीतील फवारणीदरम्यान घ्यावयाची काळजी आदी विषयांवर प्रशिक्षण दिले जाणार आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत पाळीव प्राण्यांपासून होणारे आजार, रेबीज प्रतिबंध, जनावरांची निगा व पशु आरोग्यविषयक माहिती विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे.



या उपक्रमासाठी जिल्हा परिषदेमार्फत विशेष विद्यार्थी आरोग्यदूत मार्गदर्शन पुस्तिका तयार करण्यात आली असून, तिच्या निर्मितीसाठी मुख्यमंत्री फेलो भार्गवी मुंढे यांनी पुढाकार घेतला आहे. तसेच जिल्हास्तरावर समुदाय आरोग्य अधिकारी व शिक्षक अशा सुमारे एक हजार जणांना प्रशिक्षक म्हणून तयार करण्यात आले आहे. उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी दरमहा आढावा बैठक घेणार आहेत.

या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य, स्वच्छता, कृषी व पशुसंवर्धनविषयक जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल. तसेच विद्यार्थ्यांच्या माध्यमातून गावपातळीवर जनजागृतीची प्रभावी साखळी उभी राहून आरोग्यदायी व स्वच्छ गावांच्या निर्मितीस चालना मिळेल, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी व्यक्त केला.

# विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचे अनेक नगरसेवक पर्यटनासाठी उत्तर भारताकडे रवाना

**नांदेड(प्रतिनिधी)** –स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीत भाजप व महायुतीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांचे पारडे जरी जड असले तरी विरोधी पक्षाच्याही काही नगरसेवकांना 'पर्यटना'साठी रवाना करण्यात आले आहे. पर्यटनासाठी गेलेले सर्व नगरसेवक निवडणुकीच्या एक दिवस अगोदर परतणार असल्याचेही सांगण्यात येते.

नांदेड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत अमरनाथ राजूरकर हे भाजप महायुतीचे उमेदवार, महाविकास आघाडीचे कृष्णा पाटील आष्टीकर व वंचित बहुजन आघाडीचे प्रशांत इंगोले हे तिघेजण निवडणूक रिंगणात आहेत.

नांदेड जिल्ह्यात एकूण ४५२ मतदारांची संख्या असून हे मतदान दि. १८ जून रोजी आहे. निवडणुकीच्या प्रारंभी भाजपचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांच्यापुढे आव्हान उभे करण्याचा प्रयत्न केला. शेवटपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारी प्रवीण पाटील चिखलीकर यांना मिळवून देण्यासाठी आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी प्रयत्न केले. अखेर महायुतीचा धर्म म्हणून तसेच वरिष्ठ नेत्यांच्या आदेशावरुन त्यांना उमेदवारी मागे घेवून भाजप उमेदवाराला पाठिंबा घोषित केला. राष्ट्रवादी काँग्रेसने पाठिंबा दिल्याने भाजपला ही निवडणूक अत्यंत सोपी झाली आहे. अमरनाथ राजूरकर व कृष्णा पाटील आष्टीकर यांच्यातच खरी लढत होत आहे. निवडणुकीतील नियोजनबद्ध पद्धतीने अमरनाथ राजूरकर यांनी महायुती व महाविकास आघाडीच्या असंख्य नगरसेवकांशी प्रत्यक्ष चर्चा केली. उमेदवारांकडून 'संपर्क' होत असल्याने अनेक नगरसेवकांच्या चेहऱ्यांवर आनंद दिसत होता. ३०० पेक्षा जास्त नगरसेवकांशी 'संपर्क' करून गोवा व उत्तर भारतातील काही ठिकाणी पर्यटनासाठी भाजपने रवाना केले आहे.

निवडणुकीत दगाफटका होणार नाही याची काळजी पक्षातील वरिष्ठ नेते सुद्धा घेत आहेत. नगरसेवकांच्या प्रत्येक हालचालींवर लक्ष ठेवून आहेत. तिकडे कृष्णा पाटील आष्टीकर यांना विजयी करण्यासाठी खासदार नागेश पाटील आष्टीकर आणि शिवसेनेची मंडळीही कामाला लागली आहे.

# लिटल स्कॉलर पब्लिक स्कूल व अक्षरा प्री-प्रायमरी स्कूलच्या गोदामाला भीषण आग; शैक्षणिक साहित्य जळून खाक





**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरालगतच्या तरोडा परिसरातील लिटल स्कॉलर पब्लिक स्कूल व अक्षरा प्री-प्रायमरी स्कूलच्या संयुक्त गोदामाला सोमवारी भीषण आग लागून मोठ्या प्रमाणात शैक्षणिक साहित्य जळून खाक झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, गोदामातून धुराचे लोट व आगीच्या ज्वाळा उसळत असल्याचे निदर्शनास येताच परिसरात एकच खळबळ उडाली. नागरिकांनी तत्काळ अग्निशमन विभागाला माहिती दिल्यानंतर अग्निशमन दलाच्या तीन बंबांसह जवान घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करीत आग आटोक्यात आणली.

आगीमुळे दोन्ही शाळांमध्ये वापरासाठी साठवून ठेवण्यात आलेले शैक्षणिक साहित्य, वह्या, पुस्तके, फर्निचर तसेच इतर आवश्यक वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू करण्यात आला आहे.

अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग शेजारील परिसरात पसरण्यापासून रोखण्यात यश आले. अन्यथा मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

दरम्यान, या घटनेप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. नुकसानाचा पंचनामा करून आगीचे नेमके कारण अस्पष्ट असल्याचे सांगण्यात आले.

# उमरी तालुक्यात साडेनऊ लाखांची चोरी; गुन्हा दाखल

## सोलार केबल व तारांवर चोरट्यांचा डल्ला

**नांदेड (प्रतिनिधी)–** उमरी तालुक्यातील सोमठाणा शेत शिवारात एका कंपनीच्या सोलार केबल व तारांवर चोरट्यांनी डल्ला मारला. या चोरीत तब्बल ९ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. ही चोरी ७ जून रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास झाली.

उमरी तालुक्यातील सोमठाणा शिवारात ऐसेन्स रिनीव्हेबल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे सोलार केबलचे काम चालू आहे. त्यांच्या साइटवरून सोलार केबल आणि तार असा ९ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला. ही बाब उघडकीस आल्यानंतर कंपनीचे राघवेंद्र पाटील यांच्या फिर्यादीवरून उमरी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक पोपलवार करत आहेत.

**तामसा शिवारात तीन म्हशींची चोरी**

हदगाव तालुक्यातील पाथरड शिवारात ७ जूनच्या पहाटे दोनच्या सुमारास बालाजी रुखमाजी हरणे यांच्या शेतातील आखाड्यावर बांधलेल्या ९० हजार रुपये किमतीच्या तीन म्हैशी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या. बालाजी हरणे यांच्या फिर्यादीवरून तामसा पोलीस ठाण्यात जनावर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार गायकवाड करत आहेत.

**किनवट येथे अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा जप्त; तिघांवर गुन्हा दाखल**

किनवट येथील सहायक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरेश किसन अंकुरवार (वय ३९ रा. वायफनी ता. माहूर), ज्ञानेश्वर दहिफळे आणि सागर गोविंद नागरगोजे या तिघांनी संगनमत करून विनापरवाना बेकायदेशीररित्या आपल्या ताब्यातील हायवा क्रमांक (एमएच४० सीएम ८११०) मध्ये सहा ब्रास वाळू असा २५ लाख ३६ हजारांचा मुद्देमाल किनवट पोलिसांनी जप्त केला आहे.

या प्रकरणी तीन जणांविरुद्ध सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद जाधव यांच्या फिर्यादीवरून किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक झाडे करत आहेत.

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात ११ जूनचे सकाळी ६ वाजेपासून ते २५ जून २०२६ चे मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हा दंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात ११ जूनचे सकाळी ६ वाजेपासून ते २५ जूनच्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील.

# पहिल्याच पावसात संरक्षण भिंत कोसळली; सार्वजनिक बांधकाम विभागाचे पितळ उघडे

**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा शहरात परवाच्या दिवशी झालेल्या पहिल्याच पावसामध्ये औद्योगिक प्रशिक्षण केंद्राची संरक्षण भिंत पाण्यामुळे कोसळली. या प्रकरामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकृष्ट कामाचे पितळ उघडे पडले आहे.

शहरातील शासनाच्या वतीने विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय व्हावी म्हणून आयटीआयची व्यवस्था करण्यात आली आहे. नांदेड-लातूर रोडवरील जागेमध्ये आयटीआयची इमारत देखील उभी करण्यात आली आहे आणि त्या इमारतीचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. संबंधित कंत्राटदार याने ही इमारत अत्यंत निकृष्ट दर्जाचा माल वापरून तयार केली आहे. आयटीआयमध्ये प्रशिक्षण देण्यासाठी उभारण्यात आलेल्या प्रयोगशाळा इमारतीला तडे गेले आहेत. या होत असलेल्या संपूर्ण कामाची कंत्राटदार व संबंधित अभियंत्याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून गुत्तेदाराला दिलेले हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असून, परवाच्या दिवशी झालेल्या पावसामुळे बांधकाम करण्यात आलेली संरक्षण भिंत पूर्णतः पडली आहे. भविष्यात बांधकाम करण्यात आलेल्या या इमारतीस तडे जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अगदी माळाच्या कडेला आयटीआयची इमारत असून अजून पावसाळ्यात जर मोठा पाऊस आला तर त्या इमारतीला देखील धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, म्हणून त्या संपूर्ण कामाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



आयटीआयची ही संरक्षण भिंत पावसामुळे कोसळली असल्याची माहिती संबंधित पत्रकारांना मिळाली. या माहितीवरून घटनास्थळी जाऊन त्याची पाहणी केली असता या कामाबाबतची माहिती संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता बलराज सोमवंशी यांना विचारल्यानंतर त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली. माहिती तुम्हाला पाहिजे असेल तर माहितीच्या अधिकाराखाली कार्यालयात अर्ज करा, अशा प्रकारचे बेजबाबदार उत्तर त्यांनी दिले. त्यांचीही वरिष्ठ अधिकाऱ्याकडून चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# नांदेड विभागात आंतरराष्ट्रीय समपार फाटक जागरूकता दिन साजरा

## २३ समपार फाटकांवर रस्ता वापरकर्त्यांचे समुपदेशन; चार लाख एसएमएस संदेशांद्वारे जनजागृती

**नांदेड (प्रतिनिधी)–** आंतरराष्ट्रीय समपार जागरूकता दिन २०२६ निमित्त दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत दि. ९ जून रोजी रेल्वे समपार फाटकांचा वापर करताना सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करण्यात आले. तसेच रस्ता वापरकर्त्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी व्यापक अभियान राबविण्यात आले.

हे अभियान विभागातील संरक्षा, परिचालन, सुरक्षा बल, अभियांत्रिकी तसेच सिग्नल व दूरसंचार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले. नामनिर्देशित सर्व विभागांच्या प्रतिनिधींनी सक्रिय सहभाग घेत रस्ता वापरकर्त्यांना रेल्वे समपार फाटकांवरील सुरक्षिततेचे नियम पाळण्याचे महत्त्व समजावून सांगितले.




मुदखेड - आदिलाबाद, परभणी - जालना, परभणी-गंगाखेड आणि जालना-छत्रपती संभाजीनगर या विभागांतील सुमारे २३ समपार फाटकांवर जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. रेल्वे अधिकाऱ्यांनी रस्ता वापरकर्त्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून समपार फाटकांवरील सुरक्षितता नियमांचे उल्लंघन केल्यास उद्भवणाऱ्या धोक्यांविषयी माहिती दिली. तसेच रेल्वे रुळ ओलांडण्यापूर्वी थांबा, दोन्ही बाजूंनी पाहा आणि मार्ग सुरक्षित असल्याची खात्री करूनच पुढे जा, असा संदेश देण्यात आला.

सुरक्षिततेचा संदेश अधिक व्यापकपणे पोहोचविण्यासाठी रस्ता वापरकर्ते व स्थानिक नागरिकांमध्ये माहितीपत्रकांचे वितरण करण्यात आले. तसेच गावांमध्ये व समपार फाटकांवर ध्वनिक्षेपकांच्या माध्यमातून जनजागृती मोहीम राबवून रेल्वे रुळ व समपार फाटक ओलांडताना घ्यावयाच्या सुरक्षिततेच्या खबरदारींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# नांदेड फ्रुट मार्केटमध्ये कच्चा आंब्याची मोठ्या प्रमाणावर आवक

## आंध्र प्रदेश व तेलंगणातील हवामानाचा परिणाम; विविध शहरांतून वाढती मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** मालटेकडी येथील किसान फ्रुट मार्केटमध्ये सध्या कच्चा आंब्याची मोठ्या प्रमाणावर आवक होत असून, बाजारात चांगलीच मागणी होत असल्याचे पाहायला मिळत आहे. आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यांमध्ये अलीकडेच झालेल्या जोरदार वाऱ्यामुळे तसेच बदलत्या हवामानाच्या परिणामामुळे मोठ्या प्रमाणात आंब्याची फळे झाडांवरून खाली पडली आहेत. त्यामुळे कच्चा आंब्याचा पुरवठा अचानक वाढल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.



नांदेड किसान फ्रुट मार्केटमध्ये दररोज मोठ्या प्रमाणावर कच्चा आंब्याची वाहतूक होत असून, व्यापारी आणि घाऊक विक्रेत्यांची लगबग वाढली आहे. येथून औरंगाबाद, अम रावती, मुंबई, पुणे तसेच गुजरातमधील विविध शहरांमध्ये कच्चा आंब्याला म ोठी मागणी असल्याने मालाची नियमित पाठवणी सुरू आहे. व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार येत्या काही दिवसांत कच्चा आंब्याची आवक आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर बाहेरील बाजारपेठांमधूनही मागणीत वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. विशेषतः लोणचे, मसालेदार पदार्थ तसेच हंगामी खाद्यपदार्थांसाठी कच्चा आंब्याला मोठी मागणी निर्माण झाली आहे. कच्चा आंब्याच्या वाढत्या आवकमुळे नांदेडच्या फ्रुट मार्केटमध्ये आर्थिक उलाढालीला चालना मिळत असून, शेतकरी आणि व्यापारी वर्गाला याचा फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बाजारातील वाढती गर्दी आणि व्यापारातील हालचालींमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com